रायगड, मंगळवार, दि. २० फेब्रुवारी २०२४

वृषीवल

किंमत ४ ₹

१४४ सरकारी बाबूंना

लाचखोरीचा मोह

वर्षभरात रायगडातील १८ जणांना अटक

राकेश लोहार

। चौल ।

सरकारी नोकरी मिळावी यासाठी रात्रंदिवस जागून कठोर परिश्रम घेणारे तरुण खुर्चीवर बसताच पैशांच्या मागे लागत आहेत. गेल्या वर्षभरात, म्हणजेच दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत ठाणे परिक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून झालेल्या कारवायांवरुन हे सिद्ध झाले आहे. पैशाचा मोह न आवरणारे संपूर्ण ठाणे परिक्षेत्रात १४४ आरोपी असून, तरुण वयातील दहा, तर उतार वयातही ३६ लोकांना बेड्या ठोकल्या आहेत. लाचेची सर्वाधिक प्रकरणे महसूल आणि पोलीस खात्यातून उघडकीस आली आहेत. दरम्यान, रायगड जिल्ह्यातील १८ सरकारी बाबू लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत.

मागील काही वर्षांपासून जिल्ह्यात पैसे घेऊन काम करणाऱ्या सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या वाढत आहे. महसूल, शिक्षण, पोलीस, महापालिका, नगरपरिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषदेत असे प्रकार सर्रासपणे सुरू असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मागील वर्षभराच्या कारवाईतून स्पष्ट होते. अगदी १००० रुपयांपासून ते तीन लाखांपर्यंत लाच घेताना हे सरकारी कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत; परंतु दुर्दैव म्हणजे यात २० ते ४० वर्षे वयोगटातील ६० लोकांचा यात समावेश आहे.

ठाणे परिक्षेत्रांतर्गत ठाणे, पालघर, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश आहे. सध्या शासकीय नोकरीसाठी जीवघेणी स्पर्धा आहे. अशा स्थितीतही कठोर परिश्रम घेऊन हे तरुण सरकारी खुर्चीवर बसतात. आपण चांगले काम करुन सामान्यांची सेवा करण्यासह प्रामाणिक कर्तव्य बजावण्याचे ध्येय उराशी ठेवतात; परंतु, शासकीय नोकरी मिळाल्यानंतर काही दिवसांतच त्यांना पैशांचे आमिष लागते अन् हळूहळू लाच घेण्यास सुरुवात करतात. ठाणे परिक्षेत्रांतर्गत गेल्या वर्षभरात १४४ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लाचेची मागणी करीत ती स्वीकारताना त्यांना रंगेहाथ पकडले आहे. जिल्ह्यातील सर्वच सरकारी कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बिनशर्त जनतेची कामे करणे अपेक्षित आहे. मात्र, हे कर्मचारी प्रत्येक काम करण्यासाठी काही ना काही चिरीमिरी घेण्यासाठी अडवणूक करुन जनतेचा छळ करतात, अशी अनेक प्रकरणे उघडकीस येत आहेत. सरकारी यंत्रणा भ्रष्टाचाराने ग्रासलेली असल्याचे चित्र एसीबीकडून मिळालेल्या माहितीवरुन स्पष्ट होत आहे.

निवृत्तीच्या उंबरठ्यावर पैशाचा हव्यास भोवला

तरुणांबरोबरच नोकरीतून निवृत्त होण्याच्या काही दिवस अगोदरही काही लोकसेवक लाचेची मागणी करतात. अशा ५१ ते ६० वर्षे वयोगटातील ३६ लोकांना सापळा रचून बेड्या ठोकण्यात ठाणे परिक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला यश आले आहे.



वयोगटानुसार लाचखोरीची आकडेवारी	
२०-३०	१०
३१-४०	५०
४१-५०	४८
५१-६०	३६

रायगड जिल्ह्यात १८ कारवाया

रायगड जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वर्षभरात तब्बल १८ कारवाया केल्या आहेत. यात २० ते ३० वयोगटातील दोन, ३१ ते ४० वयोगटातील पाच, ४१ ते ५० वयोगटातील पाच तर, सर्वाधिक ५१ ते ६० वयोगटातील सहा जणांचा समावेश आहे. संपूर्ण हयात सरकारी नोकरीत घालवल्यानंतर उरलीसुरली इज्जत वेशीला टांगण्याच्या प्रकरणांमध्ये वाढ होताना दिसत आहे.

गेल्या काही वर्षांत सरकारी कर्मचारी लाच घेण्याच्या प्रकरणात वाढ झाली आहे. परंतु, आरोपी कोणीही असो, तक्रार आल्यानंतर तात्काळ सापळा लावून कारवाई केली जात आहे. गेल्या वर्षभरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन १८ गुन्हे उघडकीस आणले असून, आरोपींना ताब्यात घेतले आहे. अधिकारी क्लास वन असो वा शिपाई, जर सामान्यांकडून लाचेची मागणी करीत असेल, तर तक्रारदारांनी त्यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी पुढे यावे. यासाठी आमच्या १०६४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

– शशिकांत पाडावे, उपअधीक्षक, रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

ठाणे परिक्षेत्र विभागनिहाय आरोपी

- खासगी ०९
- न्याय विभाग ०३
- वनविभाग १०
- कृषी विभाग ०१
- जिल्हा परिषद ०५
- नगरपरिषद ०३
- परिवहन विभाग ०६
- आरोग्य विभाग ०५
- ग्रामपंचायत ०६
- नगरविकास ०१
- निबंधक ०२
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ०१
- बांधकाम विभाग ०१
- सेवाकर विभाग १

दुधाच्या टेम्पोने तिघींना चिरडले

जैन साध्वींसह दोघींचा मृत्यू

● (छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

सोमवारी पहाटे पावणे सहाच्या सुमारास खोपोलीहून कर्जतला आलेल्या चार जैन साध्वी व त्यांच्याबरोबर असलेल्या जैन महिला अशा एकूण बारा जणी कर्जतहून नेरळकडे जात असताना मागून सुसाट येणाऱ्या दुधाच्या टेम्पोने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्या टेम्पोने तिघींना अक्षरशः चिरडले. यामध्ये एक जैन साध्वी व एक जैन महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर एक भगिनी गंभीर जखमी झाली आहे. जखमी झालेल्या जैन महिलेला पुढील उपचारासाठी पनवेलकडे नेण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे कर्जत परिसरात शोककळा पसरली असून, जैन बांधवांची दुकाने सोमवारी दिवसभर बंद ठेवण्यात आली होती. धडक देऊन पळून चाललेल्या टेम्पो चालकाला कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सोमवारी पहाटे कर्जतहून चार जैन साध्वी नेरळकडे जात होत्या. त्यांच्याबरोबर काही जैन महिलाही होत्या. यापैकी मौलिकपूर्णा श्रीजी, लता ओसवाल-हिंगड, दिवाली ओसवाल या •> पान २ वर

महिलेला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

। पुणे । प्रतिनिधी ।

मागील काही दिवसांत पुणे शहरातील गुन्हेगारीच्या घटना काही थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. आता पुन्हा एक धक्कादायक प्रकार पुणे शहरात समोर आला असून, या घटनेने पुणे शहर हादरून गेले आहे. पार्किंगच्या वादातून एका महिलेला जिवंत जाळण्याचा प्रयत्न झाल्याचा प्रकार समोर आला आहे. महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला, •> पान २ वर

साडेपाच लाखांचे एमडी जप्त

। पनवेल । वार्ताहर ।

गुन्हे शाखा पोलिसांनी खारघर येथून ५ लाख २० हजार रुपये किमतीचा मेफेड्रॉन हा अमली पदार्थ जप्त केला आहे. याप्रकरणी एका नायझेरियन व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. खारघर सेक्टर ३५ येथे एकजण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती.

त्याद्वारे वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी यांच्या पथकाने त्याठिकाणी सापळा रचला होता. यावेळी तिथे आलेल्या एका नायझेरियन व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने त्याचे नाव अब्दुल राक हसन (३४) असल्याचे सांगितले. त्याच्या अंगझडतीमध्ये त्याच्याकडे ५ लाख २० हजार रुपये किमतीचे ५५ ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) हा अमली पदार्थ आढळून आला. ग्राहकांना पुरवण्यासाठी हे अमली पदार्थ घेऊन तो त्याठिकाणी आला होता. याप्रकरणी त्याच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवी मुंबईतील काही •> पान २ वर

आजचा अग्रलेख

हा भ्रष्टाचार कोणाचा?

वेधक

मी काँग्रेसमध्ये!

नवी दिल्ली : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ आणि त्यांचा मुलगा नकुलनाथ भाजपामध्ये जाणार अशा चर्चांना उधाण आले होते. मात्र भाजपात जाणार नसल्याचे स्पष्टीकरण कमलनाथ यांनी माध्यमांशी बोलताना दिले. त्यामुळे चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. दरम्यान, याबाबत ते उशिरा पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडणार आहेत.

फसवणुकीतून नैराश्य; कर्मचारी बेपत्ता

उरण : जमीन खरेदी व्यवहारात फसवणूक झाल्याप्रकरणी नवी मुंबई पोलीस दलातील एका कर्मचाऱ्याने घर सोडून बेपत्ता झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलीस कर्मचाऱ्याच्या पत्नीने कळंबोली पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार नोंदवली आहे. सुंदरसिंह शीतलसिंह ठाकूर नेमणूक उरण पोलीस ठाणे असे बेपत्ता झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. सुंदरसिंह यांना एका बँक मॅनेजरने •> पान २ वर

शिवरायांना अभिवादन!

● (छायाचित्र : समीर मालोदे)

अलिबाग येथील शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी पुष्पहार अपर्ण करुन अभिवादन केले. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, उमाकांत कडनोर, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक अंगाई साळुंखे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांची बाष्फाळ आश्वासनं हवेत विरली

जिल्हा सरकारी रुग्णालयाचे ऑडिट रखडले

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्हा नियोजन समितीमार्फत कोरोना कालावधीत, तसेच गेल्या दहा वर्षांत जिल्हा सरकारी रुग्णालयाचे सुशोभिकरण आणि डागडुजीसाठी करण्यात आलेल्या खर्चाचे ऑडिट करण्याचा निर्णय पालकमंत्री उदय सामंत यांनी घेतला होता. मात्र, अद्याप याबाबत कोणतीच ठोस कार्यवाही झाली नसल्याने पालकमंत्र्यांनी दिलेली बाष्फाळ आश्वासन हवेत विरली आहेत.

रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण जिल्हा सामान्य रुग्णालयात येत असतात. १९८२-८३ मध्ये अलिबाग येथे इमारत उभारण्यात आली. आता जुन्या इमारतीला ४२ वर्षे झाली आहेत. सरकारी रुग्णालयाच्या इमारतीच्या डागडुजीचे काम सातत्याने करण्यात येत असल्याने हा मुद्दा चर्चेत येत आहे. यासाठी सुमारे दीड •> पान २ वर

आज अधिवेशन

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारच्यावतीने उद्या मंगळवारी (दि.२०) विधिमंडळाचं विशेष अधिवेशन घेतलं जाणार आहे. या अधिवेशनात आरक्षणासाठी विशेष कायदा केला जाणार आहे. त्यामुळे मराठा समाजासाठी उद्याचा दिवस महत्त्वाचा असणार आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळावं. याचबरोबर सगेसोयऱ्यांचा कायदा पारित झाला नाही, तर २१ तारखेपासून नव्या आंदोलनाची दिशा ठरवणार असल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

आजपासून अटल सेतु 'शिवनेरी'साठी खुला

पुणे ते मंत्रालय पहिली बस धावणार; प्रवासाचा वेळ तासाभराने वाचणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवडी ते न्हावा शेवादरम्यान बांधण्यात आलेल्या नव्या अटल सेतूवरून एसटीची शिवनेरी बस सुरू करण्यात आली असून, प्रायोगिक तत्त्वावर उद्या दि. २० फेब्रुवारीपासून पुणे स्टेशन-मंत्रालय (सकाळी ६.३०) व स्वारगेट- दादर (७.००) या दोन मार्गावर शिवनेरी बस सुरू करण्यात येत आहेत. या बसेस पुणे येथून निघून थेट पनवेल न्हावाशेवा, शिवडी मार्गे मंत्रालय/दादर येथे पोहोचतील. परत ११ वाजता याचमार्गे अनुक्रमे मंत्रालय व •> पान २ वर

पुणे-मुंबई प्रवास सुखकारक

अटल सेतूवरुन प्रवास करणाऱ्या वाहनांकडून २५० रुपये इतका टोल आकारला जातो. त्यामुळे या शिवनेरी बसचे तिकीट वाढणार का, हा प्रश्न होता. परंतु, एसटी महामंडळाने तिकीट दरात कोणताही बदल केलेला नाही. तसेच प्रवासाचा वेळ साधारण तासाभराने कमी होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे पुणे-मुंबई प्रवास सुखकारक होणार आहे.

दिघी जंगल जेटीला भगदाड

■ खचलेल्या जेटीमुळे मोठ्या अपघाताची भीती

। दिघी । वार्ताहर ।
श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर, हरिहरेश्वर तसेच श्रीवर्धन या प्रसिध्द पर्यटन स्थळांना महत्त्वाकांक्षी जलमार्गाने जोडण्यात आले आहे. मात्र, या प्रवासात उपयुक्त असणाऱ्या जंगल जेटीचा भाग खचतोय. परिणामी, येथील प्रवास धोकादायक बनला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातून रायगड जिल्ह्याकडे श्रीवर्धन, मुरूड, अलिबाग आदी नयनरम्य ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढू लागल्यानंतर पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी उपयुक्त ठरणारी जंगल जेटीची निर्मिती २०१५ साली करण्यात आली. त्यामुळे पर्यटनात आणखी भर पडली आहे.

विशेषतः श्रीवर्धन व मुरूड जंजिरा या दोन प्रसिद्ध पर्यटनाला भेट देत असताना दिघी बंदरातील होणारी जलवाहतूक, येथील फेरी बोट प्रवाशांसाठी सोयीस्कर व पर्यटकांना आकर्षित करणारी ठरत आहे. मात्र, या मार्गावर जलवाहतुकीचा प्रवास करताना महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून खचलेल्या जेटीकडे दुर्लक्ष झाल्याने याचा फटका येथील पर्यटनाला बसत आहे.

दिघी ते पलीकडे दांडा जल प्रवासास अवघे १५ मिनिटे लागतात. शिवाय, बोटीतून वाहन घेऊन जाणे पुढील प्रवासाला सोपे असून, दरही आवाक्यात असल्याने दररोज अनेक प्रवासी जलप्रवासाला प्राधान्य देतात. मात्र, आता जेटी खचल्याने गाड्यांची आदळआपट होत असल्याची प्रवाशांची तक्रार आहे.

भीतीने बनतोय धोकादायक प्रवास
समुद्रातील अजस्त्र लाटांचा मारा झेलत पाण्यात उभी राहणारी बोट ज्यावेळी वाहन चढविताना रॅम्प जेटीच्या धक्क्याला लावून उभी राहते, त्यावेळी मोठी कसरत करून वाहनांना बोटीच्या आत जावे लागते. जेटीचा भाग खचल्याने त्या मार्गाची काही अंश असणारी समानता न राहिल्याने वाहनांची घासाघस होऊन प्रवाशांना भीतीने धोकादायक प्रवास करावा लागत आहे.

> **पर्यायी बाजूलाच असणाऱ्या दुसऱ्या जेटीचे कामकाज सुरू असून, तेथून प्रवासी वाहतूक सुरू करण्यात येणार आहे. त्यानंतर येथील दुरूस्ती करण्यात येईल.**
> **– सी.जे. लेपांडे, मेरीटाईम बोर्ड अधिकारी**

आरटीओची कारवाई

पनवेल : प्रादेशिक परिवहन विभागामार्फत (आरटीओ) एसटी स्थानकाजवळील उड्डाणपुलाखाली रिक्षाचालकांवर कारवाईची मोहीम सुरू आहे. यावेळी अनेक रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली.

पनवेल आरटीओमार्फत रिक्षाचालकांवर कारवाईचा बडगा उभारण्यात आला आहे. बहुतांशी रिक्षाचालक विनालायसन्स, विना वर्दी व कागदपत्रे नसताना प्रवासी वाहतूक करतात. त्यामुळे त्यांच्यावर आरटीओने कारवाई करण्याचे निश्चित केले आहे. पनवेल बसस्थानक परिसरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलाखाली आरटीओने रिक्षाचालकांवर कारवाईला सुरुवात केली. यावेळी आरटीओचे अधिकारी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिका होऊनदेखील अद्याप रिक्षा मीटरप्रमाणे चालत नाहीत. तरी अशा रिक्षांवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येते आहे.

म्हसळा तालुक्यात गालगुंडची साथ

■ काळजी घेण्याची डॉक्टरांचे आव्हान

। म्हसळा । वार्ताहर।

शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या गालगुंड आजाराची साथ पसरली आहे. लहान मुलेही या आजाराची लागण झाल्याने त्रस्त झाली आहेत. गालगुंडमुळे ताप, खोकला, घसादुखीसारखा त्रास जाणवू लागतो. यामुळे रुग्णालयात उपचारासाठी अशा रुग्णांची संख्यादेखील वाढली आहे. दरम्यान, गालगुंड हा संसर्गजन्य आजार असल्याने वेळीच खबरदारी घ्यावी, असा सल्ला डॉक्टरांमार्फत पालकांना दिला जात आहे. गालगुंड एक विषाणूजन्य आजार आहे, ज्याचा प्रादुर्भाव हिवाळ्यात वाढतो. हा विषाणू खोकणे, शिंकणे किंवा बोलण्याव्दारे मुलांच्या शरीरात प्रवेश करतो.

या आजारात मुलांच्या लाळग्रंथी सुजतात, त्यामुळे त्यांच्या गालांचा काही भाग सुजतो. कधी कधी दोन्ही दोन्ही गाल सुजतात. हा आजार झालेल्या मुलांना अन्न गिळता येत नाही आणि पाणीही पिता येत नाही. यामुळे त्यांच्या पचनसंस्थेवरही परिणाम होतो.हा आजार संसर्गजन्य असल्यानें शाळेत जाणाऱ्या लहान मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो.

> **शहरात या आजाराचे रुग्ण आढळून येत असून, लहान मुलांमध्ये याचे प्रमाण मोठे आहे. याकरिता पालकांनी पाल्याला आजारी असताना शाळेत पाठविणे टाळावे, जेणेकरून आजाराचा फैलाव होणार नाही. बाधित व्यक्तीने आवश्यक औषधोपचार घेत पाण्याने अंग पुसावे, भरपूर पाणी प्यावे, वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.**
> **– डॉ. महेश मेहता, वैद्यकीय अधिकारी, म्हसळा ग्रामीण रुग्णालय**

महिलांसाठी 'भयमुक्त' कार्यशाळा

। पेण । वार्ताहर ।

भय वाटणे ही संपूर्णतः नैसर्गिक भावना नाही. असे असते तर स्त्रियांना ज्याबद्दल भीती, दडपण, टेंशन वाटते, तेच पुरुषांनाही वाटले असते. आपल्या सामाजिकीकरणावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. गरीब व कष्टकरी बाईचे जीवन तर अनेक प्रकाराच्या बंधनात अडकलेल असतं. 'या भयातून मुक्ती म्हणजेच आमचं खरं स्वातंत्र्य' असे उद्गार स्त्री मुक्ती संघटनेच्या अलका पावनगडकर यांनी काढले. त्या अंकुर ट्रस्टमार्फत आयोजित आदिवासी महिलांच्या कार्यशाळेत बोलत होत्या.

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील, इंटरनॅशनल जस्टीस मिशनचे श्री. केल्वीन, श्रीमती लक्ष्मी, नम्रता बारसी आदी उपस्थित होत्या. सदर कार्यशाळा महात्मा गांधी वाचनालयात आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. वैशाली पाटील यांनी नैसर्गिक संसाधनांवरील अधिकार व महिलांची भूमिका याविषयी मांडणी केली. आदिवासी महिलांच्या आरोग्याबाबत निरा वीर यांनी मांडणी करताना त्याचा संबंध अन्नसुरक्षेशी जोडला. सोपान निवळकर, रूपम पाटील यांनी सामूहिक वनहक्क यावर सादरीकरण केले.

सदर कार्यशाळेची प्रस्तावना मीनल सांडे यांनी केली. सूत्रसंचालन पायल आंब्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आशिष सावंत यांनी केले. या कार्यक्रमास सीआरटीओ श्वेता शेट्टे, नेहा शेळके, सुजाता पाटील यांनी स्पर्धेत क्रमांक मिळवलेल्यांना बक्षीस वितरण केले.

सराईत वाहनचोरास अटक

। पनवेल । वार्ताहर ।

वाहनचोरी करणाऱ्या सराईताला मोटर वाहन चोरी शोध पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून तीन गुन्ह्यांची उकल झाली असून, चोरीच्या चार मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.

कामोठे, कळंबोली परिसरात सातत्याने वाहनचोरीच्या घटना घडत होत्या. या गुन्ह्यांमध्ये सक्रिय गुन्हेगारांचा उलगडा करण्यासाठी गुन्हे शाखेचे मोटर वाहनचोरी शोधपथक तपास करत होते. घडलेल्या गुन्ह्यांच्या ठिकाणी पाहणी करून तांत्रिक बाबीच्या आधारे चोरट्यांचा शोध घेतला जात होता. यासाठी वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी उपनिरीक्षक देसाई यांचे पथक नेमले होते. त्यानुसार देसाई यांना एका संशयिताची माहिती हाती लागली होती.सापळा रचून कैलास कदम याला ताब्यात घेण्यात आले होते. अधिक चौकशीत त्याने तीन गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्याकडून उकल झालेल्या गुन्ह्यांमध्ये दोन कामोठे, तर एक कळंबोली येथील आहे. तर चौथी मोटारसायकल त्याने कुठून चोरली हे उघड झालेले नाही. कैलास हा पडघा येथे राहणारा असून, कामोठे, कळंबोली परिसरात वाहनचोरी करत होता. याप्रकरणी अधिक तपासासाठी त्याला कामोठे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुधाकर सदानंद थळकर व इतर यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये करार झालेला आहे. सदर विकत घेत असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
मापगाव ता. अलिबाग जि. रायगड	२१९	०-३६-७० पो.ख. ०-०६-८० एकूण ०-४३-५०	८-७५

वर नमूद ०-४३-५० या मिळकतीपैकी ०-२२-०० एवढी मिळकत सदर जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी सदर वरील मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यांसहीत सादर करावी.

तरी वर नमुद मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : १९/०२/२०२४

ॲड. निखील रा. पाटील
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
मो.नं. ८४१२०७७२००

पुढील आदेशापर्यंत नाव कायम राहणार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

सर्वोच्च न्यायालयाचा शरद पवार गटाला दिलासा

पुढील आदेशापर्यंत शरद पवार गटाला मिळालेले 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' हे नाव कायम राहणार, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.१९) दिला. आम्हाला निवडणूक आयोगाने दिलेले तात्पुरतं नाव निवडणुकीपर्यंत कायम ठेवा, अशी मागणी शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात केली होती. त्यानंतर न्यायलयाने हा निर्णय दिला आहे. शरद पवार गटाने चिन्हासाठी आयोगाकडे अर्ज करावा, आयोगाने नियमानुसार चिन्ह द्यावे, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

शरद पवार गटाच्या वतीने अभिषेक मनू सिंघवी सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद केला. आता लगेच अधिवेशन आहे. निवडणूक आयोगाने आम्हाला तात्पुरते नाव दिले आहे. काही दिवसात अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. नंतर निवडणुकांची तयारी सुरू होईल. आम्ही नाव आणि चिन्हाशिवाय राहू शकत नाही, त्यामुळे आम्हाला दिलेलं नाव कायम ठेवा आणि चिन्ह द्या, असा युक्तीवाद मनू सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात केला आहे.

अवैध रेतीउपसा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कर्जतमधील पेज नदीतून अवैध रेतीउपसा करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करून २४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नदीतून बेकायदेशीररित्या जेसीबीच्या मदतीने रेतीउपसा सुरू असल्याची माहिती कर्जत पोलिसांना मिळाली. पोलिसांनी शुक्रवारी सकाळी छापा टाकला. या छाप्यात ४१ ब्रास अवैध रेतीचा साठा पथकाला आढळून आला. या घटनेनंतर जिल्ह्यात रेतीउपसा राजरोसपणे सुरु असल्याचे समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक भागात आजही बेकायदेशीर रेतीउपसा होत असल्याच्या तक्रारी वाढत आहे. खाडी, समुद्र व नदीतून ही रेतीउपसा करून शासनाचा महसूल बुडविला जात आहे. मात्र या रेतीउपसा करणाऱ्यांविरोधात ठोस कारवाई करण्यास महसूल प्रशासन उदासीन ठरत असल्याचे बोलले जात आहे. महसूल विभागाकडून तक्रार करणाऱ्यांचे नाव उघड होत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे.

हिरकणी बुरुजावर अडकलेल्या दोन शिवभक्तांची सुटका

। रायगड । खास प्रतिनिधी ।

■ रायगड उतरताना वाट चुकले
■ पोलीस, रेक्स्यू टीमची मदत

रायगड किल्ल्यावरील हिरकणी बुरुज परिसरात दोन युवक अडकले होते. पोलीस आणि स्थानिक शिलेदार रेस्क्यू टीमच्या सहायाने त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. त्यामुळे सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

रविवारी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिनानिमित्त दोन शिवभक्त आले होते. रामू छोटुलाल यादव (१९) रा. उत्तर प्रदेश आणि विशाल रामेश्वर थोरात (१८) रा. सातारा अशी त्यांची नावे आहेत. ते दोघेही रायगड किल्ल्यावर आले असता त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर गडावर भ्रमंती करत होते. रायगडावरुन खाली उतरत असताना ते रस्ता चुकले आणि हिरकणी बुरुज परिसरात अडकले. त्यांनी मदतीसाठी प्रयत्न सुरु केले. हिरकणी बुरुज परिसरात दोन युवक अडकले असल्याची माहिती महाड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने यांना मिळाली. त्यांनी तातडीने आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक शिलेदार रेस्क्यू टीमच्या मदतीने दोन्ही शिवभक्तांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्रीपुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे मांडवणे, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.-पै.
गिता पॅटराव	११५	१/क	०-८०-००	८-००

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता-मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
दिनांक :२०/०२/२०२४
मो नं.९१५८२७७७२८

पान १ वरून

जैन साध्वींसह दोघींचा मृत्यू

कर्जत-कल्याण मार्गावरील वांजळे गावानजीक पुढे चालत जात असता मागून भरधाव येणाऱ्या दुधाच्या टेम्पोने या तिघींना जोरदार धडक दिली. या धडकेने मौलिकपूर्णा श्रीजी (५१) आणि लता ओसवाल-हिंगड (३५) यांना चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर दिपाली ओसवाल (३६) या गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमी झालेल्या ओसवाल यांना पुढील उपचारासाठी तातडीने पनवेल येथील गांधी हॉस्पिटल येथे नेण्यात आले. मागून येत असलेल्या तीन जैन साध्वी व जैन महिला सुरक्षित आहेत. त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही. धडक देऊन पळून चालालेल्या टेम्पो चालकाला कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड अधिक तपास करीत आहेत.

ही घटना समजताच कर्जत तालुक्यात शोककळा पसरली. विशेषतः जैन बांधवांना या घटनेचा धक्का बसला. अनेक जैन बांधव घटनास्थळी जमले, त्यांनी मृत झालेल्या जैन साध्वी व ओसवाल-हिंगड यांना कर्जतच्या उपजिल्हा रुग्णालयात आणले. त्यानंतर त्यांना जैन धर्मशाळेत आणून त्यांच्या पार्थिवावर धार्मिक विधी करून सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कर्जत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, माजी सभापती नारायण डामसे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, किरण ठाकरे, नगरसेवक विवेक दांडेकर, व्यापारी फेडरेशनचे मयूर जोशी आदींसह जैन बांधव-भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिलेला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

मात्र महिला घरात पळून गेल्याने मोठा अनर्थ टळला आहे. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेचा सीसीटीव्ही फुटेजदेखील समोर आला आहे.

पुण्यातील चंदननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खराडी परिसरात पार्किंगच्या वादातून वाद झाला. वाद एवढा विकोपाला गेला की, दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने सुरुवातीला महिलेच्या चारचाकी गाडीची तोडफोड केली. ज्यात गाडीच्या काच्या फोडण्यात आल्या. त्यानंतर महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, महिला घरात पळून गेली. पेट्रोल चारचाकी गाडीवर पडल्याने गाडीने पेट घेतला. ज्यात चारचाकी गाडीचा सीट जळाले असून, महिला सुदैवाने वाचली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांत गुन्हादेखील दाखल करण्यात आला आहे.

साडेपाच लाखांचे एमडी जप्त

विभागांप्रमाणे खारघरमध्येही मोठ्या प्रमाणात पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. मुख्यत्वे झोपडपट्टी परिसरात हे अवैध धंदे अधिक होत असल्याचे कारवाईतून समोर आले आहे. याची पालेमुळे नष्ट करण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी कंबर कसली असून, सातत्याने यासंदर्भातील कारवाई करण्यात येत आहेत.

पालकमंत्र्यांची बाष्फाळ आश्वासनं हवेत विरली

कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. तसेच या आधीच रॅम्प पाडून तो नव्याने बांधण्यासाठी सुमारे २५ लाख खर्च करण्यात येत आहेत. काहीच वर्षांपूर्वी सरकारी रुग्णालयाच्या सुशोभिकरणाच्या नावाखाली तब्बल ११ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यानंतर आता पुन्हा डागडुजीच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा चुराडा केला जात असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे.

रायगड जिल्ह्यातील जनतेचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी उभारलेली जिल्हा रुग्णालयाची इमारत कधी कोसळेल याचा नेम नाही. समोरुन इमारत चांगली दिसत असली, तरी इमारतीच्या आतील आणि मागील बाजू भयावह स्थितीमध्ये असल्याचे दिसून येते. नवीन इमारत उभारण्याचे सोडून डागडुजीचा पर्याय शोधला जात असल्याने ठेकेदारांना पोसण्यासाठीच डागडुजी आणि सुशोभिकरणाचा पर्याय वापरला जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला होता. गेल्या दहा वर्षांपासून विविध कारणांनी आतापर्यंत सुमारे १३-१४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. आता पुन्हा असा खर्च करु नका, असे पत्र त्यांनी संबंधित प्रशासन आणि सरकारला दिले होते. तसेच मध्यंतरी जिल्हा नियोजन समितीमार्फत कोरोना कालावाधीत करण्यात आलेल्या खर्चाचे ऑडिट करण्याचा निर्णय पालकमंत्री उदय सामंत यांनी घेतला होता. त्यामुळे बऱ्याच गोष्टी यातून उघड झाल्या असत्या. परंतु, अद्यापही याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पालकमंत्री कोणाला पाठीशी घालत आहेत, असा सवाल सावंत यांनी आता केला आहे.

याप्रकरणी अद्याप कोणतीही चौकशी समिती नेमण्यात आलेली नाही. तसेच याबाबत चौकशी करण्यात येत आहे, असे कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी कृषीवलशी बोलताना दिली. याप्रकरणी अधिक माहिती घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आजपासून अटल सेतु 'शिवेनरी'साठी खुला

दादर येथून निघतील. यामुळे गर्दीच्या वेळी प्रवासाचा सुमारे १ तास वाचणार आहे. तिकीट दरामध्ये कोणताही बदल केलेला नाही. तरी प्रवाशांनी शिवनेरी बस फेऱ्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

या बस फेऱ्या अर्थात, एसटीच्या अधिकृत msrtc mobile reservation ॲपवर व www.msrtc.gov.in संकेतस्थळावर आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत, अशी माहिती एसटी महामंडळाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून मुंबई-पुणे शिवनेरी बस अटल सेतूवरुन चालवण्यासंदर्भात चाचपणी सुरु होती. शिवनेरी बस मुंबईतून सुटताना त्यामध्ये ४५ प्रवासी असतील तर बस अटल सेतूवरुन नेण्यात येईल, असा प्रस्ताव विचाराधीन होता. परंतु, आता प्रवासी संख्येची कोणतीही अट न ठेवता आता दररोज सकाळी पुण्यावरुन मुंबईला दोन शिवनेरी बसेस रवाना होतील. मुंबईवरुन पुण्याला जाताना अटल सेतूचा वापर केला तर पनवेल एसटी स्थानक वगळावे लागणार आहे. पनवेलसह अन्य लहान-मोठे थांबेही घेता येणार नाहीत. त्यामुळे आता शिवनेरी बस अटल सेतूवरुन नेण्याचा पर्याय कितपत यशस्वी ठरतो, हे पाहावे लागेल.

फसवणुकीतून नैराश्य; कर्मचारी बेपत्ता

कोट्यवधी रुपयाला गंडा घातला आहे. बँक मॅनेजर रमाकांत परीडा हा ठाकूर यांचा मित्र आहे. रमाकांत परीडा हे इंडसन बँकेमध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. ठाकूर आणि परीडा हे गेल्या चार वर्षांपासून एकमेकाला चांगले ओळखतात. याचा फायदा घेऊन परीडा यांनी पोलीस कर्मचारी ठाकूर यांना खालापूर तालुक्यात चांगली जमीन घेऊन देतो, तुम्ही पैसे द्या, अशी माहिती देऊन ठाकूर यांच्यासह नवी मुंबई पोलीस दलातील अन्य दोन कर्मचाऱ्यांनी जवळपास दोन कोटी रुपये परीडा यांच्याकडे दिले होते. पैसे देऊनदेखील जमीन देत नसल्याने आपली फसवणूक झाली आहे हे या कर्मचाऱ्यांनी ओळखले होते. ही फसवणूक झाल्यानंतर या तीन कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हादेखील नोंदवला आहे. याचा तपासदेखील पोलीस अधिकारी घेत आहे. मात्र, या सगळ्या प्रकरणाला कंटाळून ठाकूर हे गेल्या आठ दिवसांपासून कर्तव्यावर गेले नाही. उलट, काही दिवसांपूर्वी कर्तव्यावर जातो असे सांगून ठाकूर घरातून बाहेर पडले होते. मात्र, ते ना कर्तव्यावर गेले, ना घरी परत आले. याप्रकरणी त्यांच्या पत्नीने कळंबोली पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, ठाकूर यांनी एक चार पानी चिठ्ठी लिहून ठेवल्याचे पोलीस तपासात आढळून आले आहे. यामध्ये परीडाने माझी फसवणूक केली असून, मी कंटाळलो आहे आणि कुटुंब सोडून जात असून, मी स्वतःला संपवत आहे, असा मजकूर लिहिला आहे.

जाहीर सूचना

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येते की **श्री मकरंद सुरेश नार्वेकर,** राहणार ८/७, ब्रॅंडी फ्लॅट्स, सोराब भरुचा रोड, ओ पास्ता रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ हे आमचे आमचे अशील यांच्याशी शेती भूखंड, गट क्रमांक ९४/ए /२, १२२ आणि १३८, मौजे कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड ही मालमत्ता आमच्या अशिलांना विक्रीने देण्यासाठी वाटाघाटी करीत आहे आणि सदरील मालमत्तांचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या परिशिष्टात विस्ताराने देण्यात आला आहे, आणि सदरील मालमत्ता हे निर्वेध, बाजारयोग्य हक्कसंबंध असलेली आणि सर्व त्या भारांपासून मुक्त आहे.

अशा सर्व त्या व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणतीही व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, बिक्वेस्ट, लीज, सब लीज, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, लिव्ह अँड लायसन्स, कोव्हीनंट, तारण, भार, ट्रस्ट, वारसा, उत्तराधिकार, किंवा कंत्राट किंवा समझोत्याचा करार, इजमेंट, राईट ऑफ वे, व्यवसाय, ताबा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय खरेदी, इजमेंटरी हक्क, स्थायी राईट ऑफ वे आदींच्या माध्यमातून अथवा अन्य कोणत्याही अन्य कोणत्याही माध्यमातून हक्क, हक्क संबंध, स्वारस्य आदी असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे, मेसर्स पूर्णानंद अँड कंपनी, ऍडव्होकेट्स, फोर्ट चेंबर्स, सी, २ रा मजला, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ आणि किंवा इ मेलच्या माध्यमातून <harshil.parekhpurnanand.co.in येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून २१ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा कोणत्याही व्यक्तीचे असे दावे अधित्यजित आहेत, असे समजण्यात येईल आणि आमचे अशील अशा कोणत्याही दाव्यांच्या आणि मागण्यांच्या अनुपस्थितीत सदरील व्यवहार पूर्ण करतील. तसेच विहित कालावधीत कोणतेही दावे प्राप्त झाले नाहीत तर, सदरील मालमत्तेवर कोणताही दावा नाही, असे समजण्यात येईल.

परिशिष्ट
पहिल्या मालमत्तेचा तपशील

फ्रीहोल्ड मोकळा शेती भूखंड, गट क्रमांक ९४/ए/२, क्षेत्र सुमारे ० हेक्टर ४१ आर ० चौरस मीटर्स ७/१२ उताऱ्याप्रमाणे, मौजे कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, उपनिबंधक अश्युरंस अलिबाग यांच्या कार्यकक्षेत आणि ज्याच्या चतुःसीमा पुढील प्रमाणे :पूर्व दिशेला किंवा त्या बाजूने :भूखंड गट क्रमांक ९४/ए/ १, मौजे कोळगाव, पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड गट क्रमांक . मौजे कोळगाव, दक्षिण दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड गट क्रमांक ९३ मौजे कोळगाव, उत्तर दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड गट क्रमांक १२५, मौजे कोळगाव या मालमत्तेचा पूर्ण तो भाग.

दुसऱ्या मालमत्तेचा तपशील

फ्रीहोल्ड मोकळा शेती भूखंड, गट क्रमांक १२२, क्षेत्र सुमारे ० हेक्टर ३२ आर २० चौरस मीटर्स ७/१२ उताऱ्याप्रमाणे, मौजे कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, उपनिबंधक अश्युरंस अलिबाग यांच्या कार्यकक्षेत आणि ज्याच्या चतुःसीमा पुढील प्रमाणे :पूर्व दिशेला किंवा त्या बाजूने :भूखंड गट क्रमांक १३६, मौजे कोळगाव, पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड गट क्रमांक १२३ आणि १२४ मौजे कोळगाव, दक्षिण दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड गट क्रमांक १२१/२ आणि ९४/ ए/१ मौजे कोळगाव, उत्तर दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड गट क्रमांक १३५ आणि १३४, मौजे कोळगाव या मालमत्तेचा पूर्ण तो भाग.

तिसऱ्या मालमत्तेचा तपशील

फ्रीहोल्ड मोकळा शेती भूखंड, गट क्रमांक १३८, क्षेत्र सुमारे ० हेक्टर ३९ आर २० चौरस मीटर्स ७/१२ उताऱ्याप्रमाणे, मौजे कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, उपनिबंधक अश्युरंस अलिबाग यांच्या कार्यकक्षेत आणि ज्याच्या चतुःसीमा पुढील प्रमाणे :पूर्व दिशेला किंवा त्या बाजूने :भूखंड गट क्रमांक १३९, मौजे कोळगाव, पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूने : भूखंड ग

क्षणवनि

शाळांना संगणक भेट

पाली/गोमाशी : न्युओ स्माईल फाउंडेशनच्या वतीने अतोणे कातकरवाडी शाळेत दोन संगणक तर खैरवाडी शाळेतील एक वर्ग खोली व वऱ्हांड्याला लादी, संगणकदेखील भेट देण्यात आले. यावेळी न्यूओ स्माईल फाऊंडेशनचे दीनानाथ तिवारी, सिमरन सिंग, तन्मय मुखर्जी ,राजेश घाग, अतोणे ग्रामपंचायत सरपंच ठकी हिलम, मुख्याध्यापक सुप्रिया भिलारे, सुनील भिलारे, सुभाष चव्हाण, विकास भिलारे, राजश्री घाग, प्राजक्ता भिलार आदी उपस्थित होते.

सोनसई पुस्तकाचे प्रकाशन

चणेरा : विविध विषयांवर सातत्याने लिखाण करणाऱ्या व्यासंगी लेखिका सुवर्णा भावे-जोशी यांच्या सोनसयी या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन रोहा ज्येष्ठ नागरिक सभागृहात करण्यात आले. भावे-जोशी यांनी सोनसयी या शीर्षकाखाली आजवर केलेल्या लिखाणाचा पुस्तकरुपी संग्रह निर्माण व्हावा अशी त्यांच्या मित्रमंडळीची भावना होती. रोहा मेहेंदळे हायस्कूलमधील १९७६-७७ च्या इयत्ता दहावी बॅचने एकत्र येत प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते.

नागरिकांना ब्लँकेटचे वाटप

उरण : श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन त्यांच्या कार्याचा व विचारांचा प्रसार व प्रचार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था या सामाजिक संस्थेतर्फे नेहमी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. सध्याचे थंडीचे दिवस लक्षात घेता थंडी पासून नागरिकांचे रक्षण व्हावे या अनुषंगाने उरण तालुक्यातील नवघर रोड येथील झोपडपट्टीत राहणाऱ्या गरजू नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

कर्जत : कर्जत तालुक्यातील शेलू येथील सेंट जेकब कॉन्व्हेंट स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला संस्थेचे संचालक पिटर अलेक्झांडर जेकब व डायना पिटर जेकब उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून ॲड. सुर्यकांत मसणे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका याबाबत ॲड. मसणे यांनी मार्गदर्शन केले.

सेवालाल महाराज जयंती साजरी

सुतारवाडी : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुडली येथे राष्ट्रसंत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन सुशीला म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. जयंतीनिमित्त त्यांच्या जीवन कार्याची माहिती मोहन राठोड व सुचेता रामधरणे यांनी करून दिली. संत सेवालाल महाराज यांच्या विचार संपूर्ण मानवजातीचा उद्धार करणारे आहेत ते आत्मसात केले पाहिजे असे मोहन राठोड यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

कळंबोलीकरांना मिळणार मुलभूत सुविधा

- पालिका आयुक्तांच्या हस्ते विविध कामांचे भूमिपूजन
- माजी नगरसेवक रविंद्र भगत यांच्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश

। पनवेल । वार्ताहर ।

गेल्या अनेक वर्षांपासून कळंबोली येथील नागरिकांच्या न्याय हक्कासाठी तत्कालीन कळंबोली सरपंच आणि माजी नगरसेवक रविंद्र भगत यांच्या लढ्याला यश मिळाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कळंबोली येथील नागरिकांच्या मुलभूत सुविधा असलेल्या पाणी, रस्ते, गटारे आदी कामांचे भूमिपूजन शिवजयंतीच्या मुहूर्तावर १९ फेब्रुवारी रोजी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते पार पडले.

रविंद्र भगत यांनी कळंबोली येथील नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सिडको प्रशासन, नंतर महापालिका अस्तित्वात आल्यानंतर पालिका आयुक्तांकडे अनेक योजनांची मागणी केली होती. पनवेल महापालिका क्षेत्रात गेल्या ६ वर्षात ३ आयुक्त नमले गेले, यामध्ये गणेश देशमुख हे दुसऱ्यांदा आयुक्त म्हणून पणवेलसाठी लाभले. सत्ताधारी आणि विरोधक यांच्या भांडणामध्ये पनवेलचा विकास कुठेतरी मागे पडत चालला होता. मात्र नगरसेवकांची मुदत संपल्यानंतर पालिका आयुक्त प्रशासक म्हणून काम पाहू लागले आणि पनवेलच्या विकासाचे अनेक प्रलंबित विषय मार्गी लागले.

कळंबोली येथील नागरिकांच्या हक्काच्या सुविधा मिळविण्यासाठी रविंद्र भगत यांना दोनवेळा बेमुदत उपोषण देखील करावे लागले होते. मात्र सत्ताधारी आणि विरोधक यांच्या लढ्यामध्ये पनवेलमधील खुंटलेला विकास पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी मार्गी लावला. पालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या २९ गावातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी पावले उचलली आहेत. यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असेल, नवीन पाईप लाईन टाकण्याचे काम, सेव्हर लाईन, रस्ते तसेच आर सी सी गटारे बांधणे आणि तलावांचे सुशोभीकरण करण्याच्या कामांना त्यांनी गती दिली आहे.

याकामांचीसुरुवातपालिकाआयुक्तांनी शिवजयंतीच्या मुहूर्तावर कळंबोली येथील केली. यावेळी त्यांनी अमृत योजनेअंतर्गत कळंबोली गावातील जलकुंभ उभारण्याचे भूमिपूजन, कळंबोली गावातील पाण्याच्या तळाशी नवीन पाईप लाईनचे भूमिपूजन, सेव्हर लाईन भूमिपूजन, रस्त्यांचे भूमिपूजन आणि आरसीसी गटर लाईनचे भूमिपूजन करून पनवेलच्या विकासाला गती दिली आहे. यावेळी माजी नगरसेवक रविंद्र भगत यांनी केलेल्या पाठपुराव्याला आणि त्यांच्या लढ्याला आयुक्त गणेश देशमुख यांनी न्याय देण्याचे काम केले असून महापालिकेत समाविष्ट झालेल्या २९ गावांचा कायापालट करण्यासाठी देखील त्यांनी नव्या निविदा काढल्याचे समोर आले आहे. शिवजयंतीच्या मुहूर्तावर अनेक विकासकामांचे भूमिपूजन करून त्यांनी कळंबोलीतील नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

आदर्श पतसंस्थेच्या वतीने पेणकरांसाठी
शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन

। पेण । प्रतिनिधी ।

शिवजयंतीची औचित्य साधून पेण गांधीमंदीर येथे आदर्श पतसंस्थे मार्फत विद्यार्थी व नागरिकांसाठी शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांनी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन ॲड.मंगेश नेने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजीत पाटील, संजय राऊत, अरविंद वनगे, अप्पा सत्वे, अशोक शिंदे, य.भी. तेरवाडकर पेण शाखा व्यवस्थापक संतोष बुंदके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना संस्थापक सुरेश पाटील म्हणाले की, अलिबाग येथे पतसंस्थेच्या वतीने शस्त्र प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी आदर्श पतसंस्था नेहमीच सामाजिक उपक्रम राबवित असून यातून एखाद्या गरजू लोकांना मदत करणे, आरोग्य शिबीर भरविणे असे कार्यक्रम होत असतात. अनन्या ठेव योजनेद्वारे लहान मुलांना आर्थिक व्यवहाराचे ज्ञान होण्यास मदत होते असे सांगून या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

नागरिकांनी केली उल्हास नदीची स्वच्छता

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणाहून वाहणाऱ्या उल्हास नदीत कचरा साठल्याने दहिवली गाव परिसर विचार मंचाच्या माध्यमातून नदी स्वच्छता अभियान करून उल्हास नदीची स्वच्छता करण्यात आली.

दहीवलीतील अनेकांनी सहभाग घेऊन उल्हास नदी स्वच्छ केली. गिरीश सुर्वे, शाम देशमुख, बाळा रामाणे, महेंद्र महाडिक यांनी नदीमध्ये उतरुन कचरा गोळा केला. या मोहिमेसाठी नगरपालिका कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. हातमौजे, मुखपट्टी, घमेली, पंजा व जेसीबीच्या सहाय्याने नदी स्वच्छ करण्यात आली.

या अभियानात विकास चित्ते, सुनील जाधव, अतुल पवार, दिनेश कडू, मल्हारी माने, मधूकर सुर्वे,नगरसेवक संकेत भासे, विजय जिनगरे, कुणाल बर्वे, महेंद्र कर्वे, सचिन खैरे, मिलिंद चिखलकर, भरत बामणे, राहुल गायकवाड, महेंद्र तेरेदेसाई, पप्पू वडदकर, आप्पा कारूळकर, भाऊ खानविलकर, संजय देशमुख, कुमार निमकर, प्रकाश जाधव, गणेश कनोजे, जयेश घरत, दीपक बामणे, प्रकाश थोरवे, तिर्थेश शिंदे, शशीकांत कांबळे, संजय चंदने, विशाल दांडेकर, रमाकांत जाधव, शुभांगी कडू, पुनम शिर्के, अपर्णा चव्हाण यांनी सहभाग घेतला.

नवघर आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन

। उरण । वार्ताहर ।

नवघर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन रायगड जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहर भोईर व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास माजी उपसभापती महादेव बंडा, माजी सरपंच दौलतशेठ घरत, माजी उपसरपंच रवींद्र भोईर, शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे, माजी उपसरपंच सुरेश बंडा, युवा सेना नवघर विभाग प्रमुख चेतन पाटील, उपशाखाप्रमुख विशाल डाके, नितीन मढवी, संतोष पाटील, भूपेंद्र पाटील, अमित जोशी, रंजीत म्हात्रे, सौरभ घरत, नवघर गावातील कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

कसळखंड प्रकल्पग्रस्तांचे साखळी उपोषण सुरु

माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांचा जाहीर पाठिंबा

। रसायनी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील मेसर्स कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि.मु.पौध पो.माजगाव व मेसर्स आष्टे लॉजिस्टिक्स प्रा.लि. कसलखंड या कंपनीच्या व्यवस्थापनाविरुद्ध गेले तीन दिवसांपासून श्रमिक संघाच्या कामगार नेत्या श्रुती श्याम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुण हे साखळी उपोषणाला बसले आहेत.

मे कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांना नाहक त्रास दिला जातो. तो त्रास थांबला पाहिजे व कामगारांच्या मागण्यांवर चर्चा होऊन करार झाला पाहिजे. तसेच मे. आष्टे लॉजिस्टिक्स प्रा.लि. या कंपनीमधील स्थानिक कामगारांना कामावरून कमी केले गेले आहे.त्यांना पुन्हा कामावर घेऊन कामगारांच्या मागण्यांवर चर्चा होऊन करार झाला पाहिजे. आम्ही स्थानिक प्रकल्पग्रस्त आहोत आम्हाला आमचा हक्क मिळालाच पाहिजे, आदी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या आहेत.परंतु कंपनी त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. यामुळे उपोषणाला सर्वपक्षीय नेत्यांनी पाठिंबा दिला आहे. त्याच अनुषंगाने उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख माजी आ. मनोहर भोईर यांनी स्थानिक उपोषण कर्त्यांची भेट घेतली व जाहीर पाठिंबा दिला.

मनोहर भोईर यांनी सर्व उपोषणकर्त्यांना अश्वस्थ केले कि, शिवसेना तुमच्या सोबत आहे. आज सर्वच क्षेत्रातील कामगारांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे शिवाय वाढती महागाई व बेरोजगारी हा सर्वांत मोठा प्रश्न या महाराष्ट्रासमोर व देशासमोर आहे असे देखील शिवसेना जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांनी सांगितले.

खामगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला औषधे वाटप

। आंबेत । वार्ताहर।

खामगाव प्राथमिक आरोग्य केंद्राची सेवा ३० हुन अधिक वाड्यांना मिळत असून अनेक रुग्ण हे या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेत असतात मात्र दुर्गम भाग असल्याने अनेक औषधांचा तुटवडा या भागात जाणवतो. याच पार्श्वभूमीवर एस.आर. तोरगे आरोग्य दूत उरण आणि जनवादी युथ फेडरेशन माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एक हात मदतीचा या उद्देशाने या आरोग्य केंद्राला तब्बल ८० हजार रुपयांची मोफत औषधे वाटप करण्यात आली.

यावेळी आरोग्य दूत संदीप नागे, सुमन तोरगे यांच्या उपस्थितीत ही औषधे आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. गीतांजली हंभीर, आरोग्य सेविका स्नेहलता खैरे, आरोग्य सेवक मंगेश चव्हाण,स्त्री परिचारिका प्रेषिता सातनाक, रुग्णवाहिका चालक पाटील, मंजुषा म्हात्रे, रियाली पाटील, स्वप्नाली पारावे उपस्थित होते.

सांडपाणी प्रकल्प उरकण्याची घाई

रस्ते पूर्ववत करण्यास दिरंगाई : रहदारीस अडथळा

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमधील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी एसटीपी कामे सध्या युद्धपातळीवर सुरु आहेत. माथेरानमधील वस्तीच्या दृष्टिकोनातून एक महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे.या कामात वन खात्याला विचारात घेतल्याचे दिसत नाही. ठेकेदाराने अद्यापही कमी व्यासाची जेमतेम सहा इंचाचे पाईप सांडपाणी वाहून नेण्यासाठी लावण्यात येत आहेत.खूपच जलदगतीने बिले काढण्यासाठी एवढ्या घाईगडबडीत रस्त्याचे क्ले पेव्हर ब्लॉक्स काढून रस्ते खोदण्याची कामे सुरु आहेत. ज्या ठिकाणी हे ब्लॉक्स काढण्यात आलेले आहेत. ते रस्ते सुद्धा पूर्ववत केलेले नसल्यामुळे रहदारीला खूपच अडचणी निर्माण होत असून चोवीस तास रुग्णांना सेवा देणाऱ्या तसेच प्रतिष्ठित मंडळींना दस्तुरी नाक्यावर नेण्यासाठी रुग्णवाहिका चालकांना त्रासदायक ठरत आहे.

या माध्यमातून जरी सांडपाण्याचा निचरा केला जाणार असला तरीसुद्धा ज्याठिकाणी ह्या सांडपाण्याचा साठा केल्यानंतर त्या पाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्या पाण्याचे शुद्धीकरण करून अन्यत्र गार्डन अथवा झाडा झुडपांच्या वापरासाठी आवश्यक जागा अद्यापही उपलब्ध करण्यात आलेली नसून गावातील ज्या ठिकाणी ह्या सांडपाण्याचा साठा केला जाणार आहे ती जागा निश्चित केल्याचे दिसत नाही.

निदान खोदकाम केल्यावर रस्त्याचे ब्लॉक्स पूर्ववत लावावे अशी मागणी होत असुन चुकीच्या पद्धतीने आणण्यात आलेले हे सांडपाण्याचे पाईप दहा ते बारा इंच व्यासाचे लावण्यात यावेत जेणेकरून भविष्यात कमी व्यासाच्या पाईप फुटल्यावर पुन्हा रस्त्यांची खोदाई करून रस्त्याची अवस्था दयनीय होण्यापूर्वीच कामाच्या आरखड्यात बदल करावा. अन्यथा स्थानिकाना भविष्यात अनेक अडचणींना सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिक्षणामध्ये परीक्षा महत्वाची : गटशिक्षण अधिकारी चोरमळे

। रसायनी । वार्ताहर ।

शिक्षणामध्ये परीक्षा ही विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि क्षमता दर्शवते. परीक्षा देणारा विद्यार्थी हा उमेदवार असतो. विद्यार्थ्याने किती चांगले प्रदर्शन केले हे ठरवणारी व्यक्ती परीक्षक असते. त्यामुळे स्पर्धेच्या युगात परिक्षा दिल्यास उच्च दर्जाचे अधिकारी, संशोधक निर्माण होतात. असे प्रतिपादन खालापूर गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमळे यांनी केले आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळा वडवळ येथे भाषा आणि गणित विषयाची तालुका स्तरीय गुणवत्ता परिक्षा संपन्न झाल्या. वडवळ शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर थळे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, कोरोना नंतर दोन वर्षांनी पुन्हा एकदा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमळे व तालुक्याच्या विस्तार अधिकारी शिल्पा दास यांच्या संकल्पनेतून भाषा व गणित विषयाच्या तालुका स्तरीय गुणवत्ता स्पर्धा शाळा वडवळ येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. एकूण २०० पेक्षा अधिक विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले आहेत.तालुक्यातील ७० पेक्षा अधिक शिक्षक उपस्थित होते.सदर स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी साधन व्यक्ती नरेश पाटील, मनीषा म्हात्रे, चवरकर, बैसाणे, देशमुख, पठाण, नंदकुमार घरत यांचे मोलाचे सहकार्य लाभले असे सुधाकर थळे यांनी सांगितले.

स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी वडवळ शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर थळे तसेच विजया शिंदे, राजाराम जाधव , करूणा बोंबे, हर्षा काळे यांनी विषेश सहकार्य करून योगदान दिले.स्पर्धा पंच म्हणून तालुक्यातील शिक्षकांनी मोलाची कामगिरी बजावली.विजयी स्पर्धकांना बक्षिस म्हणून चषक तसेच पदकाचे योगदान सिप्ला फाऊंडेशन व अगस्त्य फाऊंडेशन यांच्या कडून प्राप्त झाले. मुलांसाठी खाऊचे वाटप बेक बेस्ट कंपनी वडवळ यांच्या कडून करण्यात आले.

'नाना भगत यांचे कार्य उल्लेखनीय'

। खारेपाट । वार्ताहर ।

काँग्रेस नेते माजी आमदार मधुशेठ ठाकूर तसेच माजी मुख्यमंत्री स्व. बॅ.ए. आर अंतुले यांचे विश्वासू कार्यकर्ते होते. राजकीय कारकिर्दीत नाव उज्वल करणारे चौल मतदारसंघातील काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते नाना भगत यांचे सामाजिक कार्यदेखील उल्लेखनीय आहे. असे प्रतिपादन रायगड जिल्हा काँग्रेस वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर यांनी नाना भगत यांच्या ८३ वर्षाचा वाढदिवसाचे औचित्य साधून कार्यक्रमात केले. यावेळी प्रदेश सचिव ॲड. प्रविण ठाकूर,रायगड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्ष ॲड. श्रध्दा ठाकूर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनिल थळे, तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण यांनीदेखील शुभेच्छा दिल्या.

परसबाग फुलवण्यावर महिलांचा भर

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

रायगड जिल्ह्यामध्ये घरच्या घरी भाजीपाला लागवड करण्यावर भर दिला जात आहे. अनेक गावे, वाड्यांमध्ये घराच्या बाजूला परसबागेच्या माध्यमातून भाजीपाल्याची लागवड केली जात आहे. त्यामुळे परसबागेचा वाढत क्रेझ यातून दिसून येत आहे.

लॉकडाऊनमुळे घरातून बाहेर पडणे कठीण झाले होते. नियमीत लागणारे भाजीपाला, बाजारातून खरेदी करणेदेखील अडचणीचे झाले होते. त्यामुळे अनेक गावांतील महिलांनी घरच्या घरी भाजीपाला लागवड करण्यास सुरुवात केली. त्यामुळे वांगी, भेंडीसारख्या अनेक भाज्या घरच्या घरी मिळत असल्याने त्या खर्चात बचत होऊ लागली. गेल्या तीन वर्षात झालेल्या या बदलाचा परिणाम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिसून येऊ लागला आहे. पावसाळा संपल्यावर अनेक महिला परसबागेच्या माध्यमातून भाजीपाला लागवड करीत आहेत. गावांमध्ये घराच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत त्याची लागवडदेखील केली जात आहे. यातून घरच्या घरी भाजीपाला मिळत असून विक्रीतून रोजगाराचे साधनदेखील खुले होऊ लागले आहे. दिवसाला एक हजारहून अधिक रुपये मिळत असल्याने घर खर्च चालविणे सोपे होऊ लागले आहे.

जिल्ह्यामध्ये परसबागेच्या माध्यमातून फावळ्या वेळेत गावांतील महिला दुधी भोपळा, कारले, वांगी, मिरची, कोथींबिर, भेंडी सारख्या अनेक भाज्यांची लागवड करत आहेत. सकाळी पाणी घालणे, गवत काढणे अशा अनेक कामांबरोबरच तयार झालेली भाजी काढून ती स्वयंपाकासाठी वापरणे, तसेच गावात, अथवा बाजारात विक्रीसाठी नेण्याचे काम महिला करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

> घरातील काम करीत असताना, मोकळा वेळ भाजीपाला लागवडीवर दिला. आज यातून विषमुक्त भाजी उपलब्ध होत असून ती बाजारात विक्रीलादेखील नेली जात आहे. यातून रोजगाराचे साधन प्राप्त होत आहे. तसेच घरच्या घरी ताजी भाजी खाण्याचा आनंदही कुटूंबियांना मिळत आहे.
>
> - तेजस्वी सुभाष औचटकर, महिला, शेतकरी

तुर्भे खुर्द येथे शेतकऱ्यांना दिले प्रशिक्षण

। पोलादपूर । वार्ताहर ।

तालुक्यातील तुर्भे खुर्द व तुर्भे बुद्रुक येथे कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२३-२४ मध्ये राबविण्यात येत असून या कार्यक्रमादरम्यान दोन्ही गावांतील एकूण ३३ लाभार्थ्यांचे अर्ज प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यापैकी १८ युनिट कुक्कुटपालन १५ युनिट दुग्ध व्यवसाय एक पॅक हाऊस ०२ गांडूळ खत प्रकल्प व एक मुरघास प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी श्रीराम मंदिरामध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थी लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हा भ्रष्टाचार कोणाचा?

दहा वर्षांपूर्वी अण्णा हजारे जोरात होते. भ्रष्टाचाराचा राक्षस गाडण्यासाठी अण्णासाहेबांनी लोकपाल नावाच्या देवाचे भजन सुरू केले होते. हा लोकपाल आला की देशातील सर्व भ्रष्टाचार नष्ट होणार होता. अडचण इतकीच होती की हा देव स्वतः हून अवतरू शकणार नव्हता. माणसांनी ठरवले तरच त्याची प्राणप्रतिष्ठा शक्य होती. नरेंद्र मोदींनी रामाची प्राणप्रतिष्ठा केली. पण लोकपालाचे नाव त्यांनी टाकून दिले आहे. अण्णा हजारे गेल्या दहा वर्षात राळेगणच्या सोडाच यादवबाबा मंदिराच्याही बाहेर पडले नसावेत. सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच निवडणूक रोख्यांमध्ये निनावी पैसे जमा करण्याची योजना बेकायदा ठरवली. खरे म्हणजे ही योजना मुळातच अत्यंत भ्रष्ट होती हे कोणाही सामान्य माणसाला कळले असते. आता न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केल्याने या योजनेत जमा झालेला पैसाही भ्रष्टच मानायला हवा. पण आता कोणी अण्णा हजारे यांचा सध्याचा वारसदार मोदी सरकारविरुध्द दिल्लीत रामलीला मैदानावर उपोषणाला बसायला तयार नाही. तेव्हा अण्णांना दिवसरात्र प्रसिध्दी देऊन ज्यांनी डोक्यावर चढवले ती माध्यमे, टीव्ही वाहिन्या यादेखील या मोदीप्रणीत भ्रष्टाचारावर गप्प आहेत. वास्तविक सर्वोच्च न्यायालयाने दणका दिल्यानंतर भाजपतर्फे अध्यक्ष किंवा पंतप्रधानांनी स्वतः येऊन स्पष्टीकरण किंवा कबुली द्यायला हवी होती. पण तसे काहीही घडलेले नाही. उलट मोदी भाजपच्या कार्यकर्त्यांचे मेळावे घेऊन आपण तिसऱ्यांदा नक्की कसे निवडून येणारच याची स्वकीर्तने गाण्यात मग्न आहेत. या रोख्यांमधून विरोधी काँग्रेस, तृणमूल, द्रमुक इत्यादींनाही निधी मिळाला हे खरे आहे. पण ही योजना त्यांनी आणलेली नव्हती. शिवाय, तिला त्यांनी आव्हान देण्याचाही प्रयत्न केला होता. भाजपने मात्र तेव्हाही आणि अजूनही या योजनेचे समर्थन चालवले आहे. न्यायालयाच्या आदेशाला कसा सुरुंग लावता येईल याचे मार्ग शोधले जात आहेत.

गुप्तपणाचा आग्रह

निवडणूक रोखे स्टेट बँकेमार्फत विकले गेले व त्यामुळे रोखीच्या व्यवहारांना तसेच काळ्या पैशाला आळा घातला गेला असा भाजपचा दावा आहे. सरकारी वकिलांनी न्यायालयातही हाच दावा केला. प्रत्यक्षात या योजनेत इतक्या भानगडी होत्या की तिच्यामधूनच पूर्वीपेक्षा अधिक काळा पैसा चलनात आला असावा. नुकतीच सुरू झालेली कंपनी, जिच्याकडे स्वतःचा एक रुपयाही उत्पन्न नाही अशी कंपनी, तोट्यातली कंपनी अशा सर्वांना पूर्वी राजकीय देणग्या द्यायला मनाई होती. ही मनाई भाजपने हटवली आणि भ्रष्टाचाराचा महामार्गच मोकळा केला. बनावट कंपनी स्थापन करून, तिला देशातून वा परदेशातून बेनामी पैसे पाठवून या रोख्यांद्वारे देणग्या देता येऊ लागल्या. भाजपने पाच-सहा वर्षात सुमारे सहा हजार कोटी रुपये या रोख्यांच्या माध्यमातून मिळवले. या योजनेतून आलेल्या देणग्यांपैकी जवळपास ५७ टक्के पैसे एकट्या भाजपला मिळाले. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या काँग्रेसच्या दहा-पंधरा पट पैसे भाजपला मिळाले. इतर पक्ष तर खिजगणतीतही नाही. लोकशाहीमध्ये दोन प्रतिस्पर्धी पक्षांमध्ये पैसे व साधनांच्या बाबतीत जर इतकी तफावत असेल तर त्यांचा मुकाबला काय प्रकारचा असेल याची कल्पनाच केलेली बरी. इतके होऊनही मोदी काँग्रेसच्या भ्रष्टाचारावर बोलणार व भाजपचे उपरणे एकदम स्वच्छ असल्याचा दावा करणार हा एक अजब प्रकार आहे. या रोख्यांमधून आलेल्या पैशांपैकी ९५ टक्के रक्कम ही किमान एक कोटी वा त्याच्या पटीतल्या देणग्यांची आहे. याचाच अर्थ या देणग्या सामान्य नागरिक, शेतकरी किंवा छोटे व्यापारी इत्यादींनी दिलेल्या नाहीत. एखाद्या राजकीय पक्षाला एक कोटी रुपये व त्या पटीत पैसे देणगी म्हणून देऊ शकणारा इसम हा विचारसरणीच्या प्रेमापायी किंवा निःस्वार्थ वृत्तीने ही उदारता दाखवेल अशी काहीही शक्यता नाही. उलट आपला धंद्याचा मतलब साध्य करण्यासाठी किंवा काळ्या धंद्यांवर पांघरूण घालण्यासाठीच इतक्या मोठ्या देणग्या दिल्या जाऊ शकतात. या योजनेत हेच झाले असावे व म्हणूनच त्यातली देणगीदारांची नावे गुप्त ठेवण्याचा भाजपचा आग्रह असावा.

नावे कळायलाच हवीत

ही नावे उघड केली तर बँकिंगच्या गुप्ततेच्या नियमांचा भंग होऊ शकतो अशा बातम्या आता सर्व वृत्तपत्रांमधून चालवल्या जात आहेत. नाव गुप्त राहील या अटीवर देणग्या दिल्या गेल्या होत्या. आता तो करार बदलता येणार नाही असे सांगितले जात आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने अशी गुप्तता पाळणे हाच नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर घाला असल्याचे ठरवले आहे. आणि, या देशात या मूलभूत अधिकारांहून सर्वोच्च काही नाही अशी ठाम भूमिका सर्वांनीच घ्यायला हवी. यात खुसपटे काढणे हे भाजपच्या हिताचे आहे. पण त्याला बँकिंग क्षेत्रातून साथ मिळाली तर ते दुर्दैवाचे ठरेल. या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात स्थगिती मागणारी याचिका केली जाऊ शकेल. मात्र तेथेही सर्वोच्च न्यायालय ठाम भूमिका घ्यायला हवी. नावे गुप्त ठेवण्याबाबत भाजपतर्फे दिला जाणारा तर्कही भयंकर आहे. एखाद्याने समजा एका पक्षाला देणग्या दिल्याचे उघड झाले व नंतर त्याचा विरोधी असलेला पक्ष सत्तेत आला तर त्या देणगीदाराविरुध्द पोलिस वा सीबीआय इत्यादींचा ससेमिरा लागण्याची शक्यता आहे असे भाजपचे प्रवक्ते रविशंकर प्रसाद म्हणाले. या वक्तव्याइतका दांभिकपणा दुसरा काही नसेल. विरोधी पक्ष वा त्यांच्याशी संबंधित लोकांना इडी इत्यादींच्या चौकशीच्या फेऱ्यामध्ये अडकवण्याच्या प्रकारांनी सध्या जे थैमान घातले आहे ते स्वातंत्र्यानंतरच्या भारतात कधीही पाहायला मिळाले नव्हते. परवा न्यायालयाचा निकाल आल्यानंतर त्याचा जणू सूड उगवण्यासाठी काँग्रेसची बँक खाती काही काळासाठी गोठवण्यात आली. त्यासाठी प्राप्तिकर खात्याचा वापर केला गेला. पुढच्या काही दिवसात निवडणूक रोख्यांमधून विरोधकांनाच कसे भ्रष्टाचाऱ्यांकडून किंवा चिनी लोकांकडून पैसा आला असे दाखवण्याचा प्रयत्न केला जाईल. गोदी मिडिया त्याला साथ देईल. या प्रचाराला घाबरता, निवडणूक रोख्यांमधून भाजपला हजारो कोटी रुपये कोणी दिले यांची नावे जाहीर व्हायलाच हवीत. त्यासाठी जरूर पडल्यास विरोधकांनी देशव्यापी आंदोलन करायला हवे.

विचार

झारखंडमध्ये पनीरसेल्वम की मांझी?

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना 'ईडी'ने अटक केल्यानंतर त्यांच्या जागी चंपाई सोरेन हे मुख्यमंत्री झाले. सोरेन कुटुंबातील कलह आणि झारखंड मुक्ती मोर्चाच्या आमदारांतील खदखद यानिमित्ताने बाहेर आली असली, तरी महागठबंधनाचे धागे इतके मजबूत होते की भाजपला 'ऑपरेशन लोटस' राबवता आले नाही. आता चंपाई हे बिहारमधील जीतनराम मांझी होतात की तमीळनाडूतील ओ. पनीरसेल्वम होतात, हे पहायचे.

शिवशरण यादव

हेमंत सोरेन यांना कथित गैरव्यवहारप्रकरणी 'ईडी'ने अटक केल्यानंतर मुख्यमंत्रिपदासाठी झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष शिबू सोरेन यांच्या कुटुंबातील सदस्य अडून बसले होते. हेमंत सोरेन यांच्या पत्नीचा तसेच भावजयीचाही मुख्यमंत्रिपदावर डोळा होता. बिहारमथ्ये लालूप्रसाद यादव यांना अटक झाल्यानंतर जशी राबडीदेवींची मुख्यमंत्रिपदी वर्णी लागली, त्याच प्रकारे सोरेन यांच्या कुटुंबातील दोनपैकी एका महिलेची निवड होईल, असे वाटत होते; परंतु झारखंडच्या राजकारणात चंपाई सोरेन यांचा नव्याने उदय झाला. त्यांच्या उदयाने बिहार आणि तामिळनाडूच्या राजकारणाची आठवण करून दिली. हेमंत सोरेन यांना बिहारसारखा प्रयोग अपेक्षित होता; तसा तो झाला नाही; पण दुसरा प्रयोग झाला. बिहारच्या इतिहासामध्ये मुख्यमंत्रिपदाच्या संदर्भात दोन प्रयोग चर्चेत राहिले. एक म्हणजे राबडीदेवींना मुख्यमंत्री करणे आणि दुसरे जीतनराम मांझी यांना मुख्यमंत्रिपदाची खुर्ची मिळणे. जीतनराम यांना प्रतिकूल परिस्थितीमध्ये मुख्यमंत्री करण्याशी समांतर प्रयोग यापूर्वी तमिळनाडूमध्येही पहायला मिळाला आहे. या दोन्ही प्रयोगांचे वेगवेगळे परिणाम दिसून आले आहेत. चंपाई सोरेन आता झारखंडचे मुख्यमंत्री झाले आहेत; मात्र यापूर्वी त्यांचे नाव मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नव्हते. आत जे काही होत असेल, त्यात ते मूक स्पर्धक असतील; पण बाहेर त्यांच्या नावाची चर्चा झाली नाही. निदान सुरुवातीच्या टप्प्यात तरी. हेमंत सोरेन यांना पत्नी कल्पना यांना मुख्यमंत्री बनवायचे होते. आपण मुख्यमंत्रीपदी परत येईपर्यंत खुर्ची सुरक्षित हातात राहील, असा त्यांचा प्रयत्न होता. अशा अनेक कुरघोडींमुळे अलिकडे झारखंडमधील राजकारण चांगलेच चर्चेत राहिले.

बिहारमध्ये लालू यादव यांनी तुरुंगात जाताना आपल्या पत्नी राबडीदेवी यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपवले होते. हेमंत सोरेन यांनीही राबडीदेवींप्रमाणे कल्पना सोरेन यांच्यासाठी सल्लागारांची फौज तैनात करण्याची योजना आखली होती. मात्र पक्षाच्या आमदार सीता सोरेन यांच्या विरोधामुळे हेमंत सोरेन यांना अपेक्षित निर्णय घेता आला नाही. सीता या हेमंत यांच्या भावजय आहेत. 'आपण हेमंत सोरेन यांना मुख्यमंत्री म्हणून स्वीकारले; परंतु कल्पना यांना मुख्यमंत्री म्हणून स्वीकारणार नाही,' असा उघड संदेश त्यांनी सासऱ्यांपर्यंत पोचवला. कौटुंबिक कलह इतका वाढला की कंटाळून त्यांनी कुटुंबाबाहेर पर्याय शोधायला सुरुवात केली. त्यात त्यांना चंपाई सोरेन हेच सर्वात योग्य आणि सुरक्षित पर्याय आणि सर्वात विश्वासार्ह व्यक्ती वाटले. झारखंडमध्ये भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या कोल्हान भागातून चंपाई सोरेन निवडून आले आहेत. त्यांना कोल्हानचा सिंह असेही म्हणतात. आता सोशल मीडियावर त्यांना झारखंडचा सिंह म्हणून संबोधण्यास सुरुवात झाली आहे. शिबू सोरेन यांचे जवळचे सहकारी आणि झारखंड मुक्ती मोर्चाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक इतकाच चंपाई यांचा परिचय नाही. ते शिबू सोरेन यांचेच नव्हे, तर हेमंत यांचेही अत्यंत विश्वासू नेते मानले जातात. पक्षात तसेच कुटुंबात त्यांचा खूप आदर केला जातो. काही लोक चंपाई यांना हेमंत सोरेन यांचा 'हो-मॅन' म्हणूनही संबोधतात. चंपाई सोरेन यांचा ते किती आदर करतात, हे सार्वजनिक कार्यक्रमांच्या चित्रांवरून दिसून येते.

एका जुन्या छायाचित्रात हेमंत सोरेन वाकलेल्या मुद्रेत दिसत असून चंपाई त्यांना आशीर्वाद देताना दिसत आहेत. जणू हेमंत सोरेन आणि चंपाई सोरेन यांचे एकमेकांशी पिता-पुत्राचे नाते असावे. अर्थात झारखंड मुक्ती मोचाने चंपाई सोरेन यांची मुख्यमंत्रिपदी निवड करण्याचे हे एकमेव कारण नाही. कोल्हान भाग हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. चंपाई सोरेनच्या आधी अर्जुन मुंडा आणि रघुबर दास हे भाजपचे दोन नेते मुख्यमंत्री होते. तसे, दुसरे मुख्यमंत्री मधु कोडा हे देखील कोल्हान भागातील होते. २०१९ मध्ये झारखंडमध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. या भागातील १३ जागांवर भाजपच्या उमेदवारांना फारच कमी मते मिळाली. भाजपला सर्वात मोठा धक्का झारखंड पूर्व भागातील मतदारसंघात बसला. तिथे तत्कालीन मुख्यमंत्री रघुबर दास भाजपचे बंडखोर नेते सरयू राय यांच्याकडून मोठ्या फरकाने पराभूत झाले. चंपाई यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दाव्यामागे हे ही एक खास कारण असल्याचे दिसले. ते सध्याच्या परिस्थितीत राजकीयदृष्ट्या योग्य मानले जाऊ शकते. चंपाई सोरेन उपकृताच्या भावनेने काम करत आहेत; परंतु त्यांचा विचार बदलला तर काय, अशी भीती आता हेमंत आणि अन्य सोरेन कुटुंबात आहे. सत्ता ही अशीच गोष्ट आहे. राजकारणातही युद्ध आणि प्रेमाप्रमाणे सर्व काही न्याय्य मानले जाते. हेमंत सोरेन यांच्यावर विश्वास ठेवला तर तेही राजकारणाचे बळी ठरले आहेत. या प्रकरणी तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जे. जयललिता खूप भाग्यवान आहेत. हेमंत सोरेन यांच्या नशिबी काय वळण येणार, हे कालौघातच कळेल.

आपल्या राजकीय कुशाग्रतेमुळे बिहारच्या सिंहासनावर विराजमान असलेल्या नितीशकुमार यांचीही अशा एका प्रकरणात चूक झाली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी घेत नितीशकुमार यांनी जीतनराम मांझी यांना बिहारचे मुख्यमंत्री केले. तामिळनाडूमध्ये तुरुंगात जाण्याच्या धोक्याचा सामना करत असताना तत्कालीन मुख्यमंत्री जयललिता यांनी आपले अत्यंत विश्वासू सहकारी ओ. पनीरसेसल्वम यांच्याकडे खुर्ची सोपवली होती. जयललिता तुरुंगातून परत येताच ओ. पन्नीरसेल्वम जयललिता यांच्याकडे खुर्ची सोपवत असत; परंतु बिहारमध्ये जीतनराम मांझी यांनी असे करण्यास नकार दिला. खुर्ची सोडण्यास सांगितले असता मांझी पसार झाले. त्यावेळी राजकीय परिस्थिती अशी होती की भाजपने केंद्रात सत्ता काबीज केली होती आणि नितीशकुमार यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सोडली होती. मांझी यांना पसंत करणारे बिहार सरकारचे काही नोकरशहा त्यांचे सल्लागार बनल्याचे ऐकिवात होते. राजकीय समीकरणेही अशी होती की सल्लागारांसोबत मांझी यांनाही भाजपकडून पाठिंबा मिळू लागला. मांझी नितीशकुमार यांच्याविरोधात विधाने करत राहिले. नंतर त्यांना हार पत्करावी लागली. नितीशकुमार यांनी पुन्हा मुख्यमंत्रिपद मिळवले. मांझी यांच्याकडून सत्ता परत घेण्यासाठी नितीशकुमारांना बाजू बदलून मुख्यमंत्री बदलण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागली नाही. नंतर तर मांझी यांनी स्वतःचा पक्ष स्थापन केला; परंतु त्यांच्या 'हिंदुस्तान अवामी मोर्चा'ला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यांचे चार-पाच आमदार निवडून येत राहिले.

तामिळनाडूमध्ये पनीरसेल्वम यांना भाजपचा पाठिंबा होता; परंतु त्यांना जयललितांच्या पक्षातील फूट टाळता आली नाही. नंतर तर पक्ष त्यांच्या ताब्यातून गेला. तरीही त्यांची जयललिता यांच्यावरची निष्ठा शेवटपर्यंत कायम राहिली. आता चंपाई सोरेन 'मांझी' बनून हेमंत सोरेन यांची बोट बुडवातात, की त्यांना बुडणाऱ्या बोटीतून वाचवतात, हे पहायचे. प्रदीर्घ संघर्षानंतर बिहारपासून वेगळे होऊन झारखंडची निर्मिती झाली. त्या वेळी झारखंडमध्ये वेगळ्या राज्यासाठी आंदोलन झाले होते. झारखंडचा विकास होत नाही आणि झारखंड ही बिहारची वसाहत राहिली आहे, अशी टीका केली जात होती. त्यामुळे स्वतंत्र राज्याची स्थापना करण्याचा आग्रह धरला गेला; परंतु स्वतंत्र राज्य झाल्यानंतर झारखंडची वाटचाल विकासाऐवजी विनाशाकडे सुरू झाली आहे. खनिज संपत्तीने समृद्ध राज्य अजूनही विकासाच्या बाबतीत झारखंड फारच मागे आहे. झारखंडच्या स्थापनेला केवळ दोन तपे झाली आहेत. गेल्या दोन तपांमध्ये झारखंडने ११ मुख्यमंत्री बघितले आहेत. चंपाई सोरेन हे झारखंडचे बारावे मुख्यमंत्री आहेत. दोन तपांमध्ये झालेल्या ११ मुख्यमंत्र्यांपैकी फक्त एकालाच आतापर्यंत कार्यकाळ पूर्ण करता आला. उर्वरित दहाजणांपैकी कुणालाही आपला कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. अशा अस्थिर परिस्थितीत आता चंपाई सोरेन यांना विधानसभा निवडणुकीपूर्वी फारच कमी काळ मिळाला आहे. त्यात ते काय करणार, हे पहायचे.

आजकाल

निवडणूक रोख्यांना आव्हान देणाऱ्या डॉ.जया ठाकूर

सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने गुरुवारी निवडणूक रोखे योजना घटनाबाह्य ठरवली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे विरोधी पक्षांनी एकमताने स्वागत केले. या बॉन्डच्या माध्यमातून सत्ताधारी पक्षाने गोळा केलेला पैसा हा जनतेचा होता. भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाला प्रोत्साहन देणारी ही योजना होती, अशा प्रतिक्रिया विरोधी पक्षाच्या नेत्यांनी दिल्या आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सीपीआय(एम) चे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी योजनेविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी या निर्णयावर ऐतिहासिक निकाल अशी प्रतिक्रिया दिली आहे. येचुरी यांनी 'एक्स'वर लिहिले, ''ज्यांनी हे रोखे विकत घेतले आणि ज्यांना ते मिळाले याचे तपशील मार्चपर्यंत सार्वजनिक केले जातील.'' काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ''आम्हाला आशा आहे की, मोदी सरकार भविष्यात अशा चुकीच्या गोष्टींचा अवलंब करणे थांबवेल आणि सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे ऐकेल; जेणेकरून लोकशाही, पारदर्शकता आणि समानता टिकून राहील.''

निवडणूक रोख्यांमुळे संविधानातील अनुच्छेद १९ (१) (अ) अंतर्गत असलेल्या माहितीच्या अधिकाराचे हनन होत असल्याचे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने ही योजना रद्दबातल ठरवली आहे. निवडणूक रोखे योजना असंवैधानिक असल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे. महत्त्वाचे म्हणजे या निकालानंतर आता याचिकाकर्त्या आणि काँग्रेस नेत्या डॉ. जया ठाकूर यांच्या नावाची सध्या प्रचंड चर्चा सुरू आहे.

निवडणूक रोखे प्रकरणात सहयाचिकाकार असलेल्या डॉ. जया ठाकूर या पेशाने दंत चिकित्सक आहेत. दातांच्या बाबतीत कोणती काळजी घ्यावी, या संदर्भातील व्हिडीओ त्या युट्यूबवर प्रसिद्ध करत असतात. तसेच त्या मध्य प्रदेश महिला काँग्रेसच्या सरचिटणीसही आहेत. विशेष म्हणजे त्यांनी केवळ निवडणूक रोखे प्रकरणातच नव्हे, तर अदानी प्रकरणापासून ते शालेय विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देण्यापर्यंत जनहित याचिका दाखल केल्या आहेत.

भोपाळमधून आपले वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर डॉ. जया ठाकूर यांनी दमोह येथील वरुण ठाकूर यांच्याशी विवाह केला. वरुण ठाकूर हे सर्वोच्च न्यायालयात वकील आहेत. विवाहानंतर त्यांनी राजकारणात येण्याचा निर्णय घेतला. या संदर्भात बोलताना त्या सांगतात, ''मी विवाहानंतरही शिक्षण क्षेत्रात काम करत होते. मात्र, मुलींसाठी खऱ्या अर्थाने काम करायचे असेल तर राजकारणात यायला हवं, असं मला माझ्या एका मित्राने सुचवले, त्यामुळे मी राजकारणात येण्याचा निर्णय घेतला.''

निवडणूक रोखे प्रकरणाव्यतिरिक्त जया ठाकूर यांनी विविध जनहित याचिका दाखल करत सरकारच्या निर्णयाविरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केला आहे. २०२२ मध्ये त्यांनी अंम लबजावणी संचालनालयाचे संचालक संजय कुमार मिश्रा यांना सततच्या मुदतवाढीला आव्हान देत सर्वो च्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना () १० टक्के आरक्षण देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाविरोधातही त्यांनी सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली होती.

२०२३ मध्ये हिंडेनबर्गच्या अहवालानंतर त्यांनी अदानी समूहाच्या चौकशीची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. याशिवाय काही वर्षांपूर्वी केंद्र आणि राज्य सरकारांनी इयत्ता ६वी ते १२वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिकाही त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेनंतर सर्व शाळांमध्ये सॅनिटरी पॅडचे वितरण करणाऱ्या व्हेंडिंग मशीन उपलब्धता करून देण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना दिले होते. तसेच केंद्र सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा लागू केल्यानंतर या कायद्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील याचिकाही त्यांनी दाखल केली होती.

या जनहित याचिकांबाबत बोलताना त्या म्हणतात, ''न्याय मिळावा, या उद्देशाने मी जनहित याचिका दाखल करत असते. एखाद्या विषयावर राजकीय पक्ष भूमिका घेत नाहीत, तर कधीकधी नेत्यांना भूमिका घेण्याची परवानगी दिली जात नाही, त्यामुळे सत्य बाहेर येत नाही.'' यावेळी त्यांनी मध्य प्रदेश सरकारच्या लाडली बहन योजनेवरही टीका केली. ''अशा योजनांमुळे कोणताही वास्तविक बदल होत असेल, असे वाटत नाही. महिलांना त्यांचे हक्क मिळायला हवेत, त्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करायला हवे'', असे त्या म्हणाल्या.

लोकसंसद

तृतीयपंथीयांचा विचार व्हावा

शिक्षकांना अशैक्षणिक कामे करावी लागल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वेळापत्रकावर होणारा परिणाम हा नेहमीच चर्चेचा व वादाचा विषय राहिला आहे. फक्त शिक्षकच नव्हे तर सरकारी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांनाही निवडणुकांशी संबंधित कामाला जुंपले जाते ही वस्तुस्थिती आहे. निवडणुका नसतानाही इतरही काही सरकारी योजना, सर्वेक्षण किंवा माहिती गोळा करण्याची कामे यासाठी शिक्षक आणि सरकारी कर्मचारी यांचाच विचार होतो. हा कामाचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीने बेरोजगार तरुणवर्ग हा सक्षम पर्याय आहे. पण तो गांभीर्याने लक्षात घेतला जात नाही. इतर पर्यायाचा विचार करायचा झाल्यास तृतीयपंथीयांचाही विचार करता येईल. भारतातील तृतीयपंथीयाचा विचार करायचा झाल्यास सरकारी कागदोपत्री, अर्जात तृतीयपंथी हा तिसरा पर्याय उपलब्ध झाला आहे. काही महत्त्वाच्या पदावरही तृतीयपंथी दिसू लागले आहेत. या काही चांगल्या बाबी असल्या तरी तृतीयपंथीयांना मिळणारी सामाजिक अवहेलना, समाजरचनेत नाकारले जाणारे स्थान या बाबी कमीअधिक प्रमाणात सर्वत्रच आढळून येतात. यातले जन्मजात किती व जन्मानंतर लादले गेलेले किंवा परिस्थितीमुळे स्वीकारावे लागणारे हिजडेपण हाही संशोधनाचा विषय ठरावा. अवहेलना आणि नाकारलेपणामुळे तृतीयपंथीयांपुढे पोटासाठी भीक मागण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. साहजिकच सार्वजनिक ठिकाणी तृतीयपंथीयांचा सुळसुळाट झालेला दिसतो. यांची संख्या निश्चितच जास्त आहे.

- दीपक काशिराम गुंडये, वरळी

मराठी साहित्यिक दिनविशेष

वीस फेब्रुवारी

१८९२:- लेखक, स्वातंत्र्य सेनानी भिकाजी लक्ष्मण कवडी यांचा जन्म. पेशाने वकील. त्यातच स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्याने कारावास तरीही फावल्या वेळात बरेचसे स्फूट लेखन त्यांनी केले. याषिवाय 'भीमशंकर महात्म्य' हे स्कंद पुराणातील भीमशंकर महात्म्य या पुस्तकाचा पाकृत अनुवाद आणि 'बालमोहन' या पुस्तकातून गांधीजी आपल्या एकादश व्रतांची माहिती विद्यार्थ्यांना करुन देत आहेत अशा कल्पना करुन प्रस्तुत पुस्तकाची मांडणी केली आहे. **१९०५:-** इतिहासाभ्यासक, वृत्तपत्र संपादक हरिहर वामन देशपांडे यांचा जन्म. 'राजपूत संस्कृती', 'राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास','सन १८५७च्या स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरुप', यावलीचा स्वातंत्र्य संग्राम: १९४२' या ऐतिहासिक ग्रंथासकह 'पौरुष प्रदीप' अश्रात महात्मा गांधी यांच्या ब्रम्हचर्यावरील लेख या ग्रंथाचे संपादन त्यांनी केले. **१९२८:-** कथा, कादंबरीकार, कवी समीक्षक आबाजी नारायण पेडणेकर यांचा जन्म. 'शेलुक', 'रेडग्रीन','वेडा आंबा' हे कथासंग्रह, 'ऐलपैल' ही कादंबरी, 'संत कबीर','संत मीराबाई', 'संत एकनाथ' यांच्या चरित्रासह; 'गीताची शाळा','गाणीबिणी', 'निबंधाची शाळा' हे बालसाहित्य; 'युद्ध आणि शांती', 'मृगजळ','मोहिनी' ही अनुवादित पुस्तके प्रकाशित. **१९३६:-** लेखक, मानसशास्त्राचे अभ्यासक किशोर मोरेश्वर फडके यांचा जन्म. 'आळस' या विषयावर 'आळसावर मात' या पुस्तकासह 'उद्योजकांचे अंतरंग', 'मन:चक्षूचे सामर्थ्य', 'चक्रम माणसांशी कसे वागावे?' ही त्यांची अन्य पुस्तके. **१९३७:-** बालसाहित्यिका सुसंगती महादेव गोखले यांचा जन्म. ह्यांच्या बालसाहित्यात 'अयोध्येचा राजा श्रीराम','असा झाडला पराक्रम', 'आदर्श गुरुशिष्य', 'इसापनीतीमधील गोष्ट', 'गणपती गजानन', 'नंदकुमार गोपाळ कृष्ण', 'शिवराय छत्रपती झाले' इ. लेखन प्रसिध्द. **१९३७:-** वकील, व्यासंगी लेखक मनोहर विष्णू काथवटे यांचे निधन. 'पारशांचा इतिहास' ह्या महवपूर्ण ग्रंथासह अजमेर स्थल वर्णन, 'भारत खंडाचा प्राचीन इतिहास, वाईचे काथवटे घराण्याची माहिती' या पुस्तकांसह खलिफा उमर आणि अबुबकर यांची चरित्रे लिहिली. 'भारतखंडाचा प्राचीन इतिहास' या ग्रंथातून ख्रिस्तपूर्व ६०० ते इ.स १२००पर्यतचा इतिहास रेखाटला आहे. याषिवाय 'सुधारणा, उद्भव व उपाय' हे एडवर्ड कार्येटर च्या पुस्तकाचे भाषांतर प्रसिध्द. एकंदरीत इतिहास या विषयावर आपल्या लेखणीने ठसा उमटवला. **१९४१:-** कवी, साहित्यरत्न प्रा. माधव पी थोरात यांचा जन्म. 'तीस वर्षांचे भूत','मनातल्या कविता' ह्या काव्यसंग्रहासह 'आपून तर माणसं हाय!' हा ग्रामीण काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९५१:-** निष्णात वैद्य आणि वैद्यकषास्त्राचे लेखक गंगाधरषास्त्री गोपाळ गुणे यांचे निधन. 'औषधीगुण धर्मषास्त्र' हा त्यांचा चार खंडात्मक ग्रंथ प्रसिध्द. याशिवाय 'डेंग्यू, इंन्फ्लुएन्झा' आदी रोगांवर त्यांनी पुस्तिका लिहिल्या. तसेच 'भिशग्विलास' या मासिकाचे ते संस्थापक संपादक. गुणे यांच्या 'औषधीगुणधर्मशास्त्र' या ग्रंथात आयुर्वेदातील सिध्दौषधे व संयुक्त कल्प यांची माहिती तर आयुर्वेद्यकलानिधी मधून औषधी गुणधर्म व शारीरिक चिकित्सा दिलेली आहे. 'चिकित्सा प्रबोध' या ग्रंथात वनस्पतींच्या उपयोगीसंबंधीचे विवेचन आहे. **१९५२:-** कवी, ललित लेखक डॉ. रा. गो. चवरे यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'अनुबंध, दव आणि तुषार' हे काव्यसंग्रह, 'ऋतुरंग' हा ललित लेख अषी साहित्य संपदा. **१९५५:-** लेखक लखनसिंह कटरे यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'प्रमेय','शाश्वत मौनाचे स्वगत', 'आदिम प्रकाशचित्रे', 'शब्दार्थाचे आधार निष्फळ' हे काव्यसंग्रह. 'जाणिवतेतील कर्कदंश' आणि 'एकोणिसावा अध्याय' हा कथासंग्रह 'लेक नि विवेक' हे ललित अशी साहित्य संपदा. **१९६८:-** लेखक राजेष षिवराम कोळंबकर यांचा जन्म. 'यशाची गॅरंटी','दुसऱ्यांना गिऱ्हाईक कसे बनवावे?', 'मुलांची टेंशन आणि आपण', 'सुखी करणारा बुद्ध', 'भेजाफ्राय', 'आता आपल्याला कशाचंच काहीच वाटत नाही' इत्यादी (काव्यसंग्रह) ३० पुस्तके प्रकाशित. याशिवाय काही व्यावसायिक व प्रायोगिक नाटके त्यांच्या नावावर आहेत. **१९७४:-** मराठीत नाट्यप्रशिक्षणाची शास्त्रशुध्द मुहूर्तमेढ रोवणारे केशव नारायण काळे उर्फ 'के नारायण काळे' यांचे निधन. स्तानिस्लावस्कीच्या 'ॲन ॲक्टर प्रिपेअर्स' वर आधारित 'अभिनयसाधना' हे पुस्तक काळे यांनी लिहिले. खेरीज 'भूमिकाशिल्प', 'कौटिल्य', 'मराठी नाटक व मराठी रंगभूमी', 'मराठी रंगभूमी : प्रतिभा, रुप आणि रंग' आदी पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. ते अभिनेते, पटकथाकार व 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'सह काही नियतकालिकांचे संपादकही होते. **१९९४:-** राज्यघटनेचे जाणकार, भारताच्या राजकीय जडणघडणीचे अभ्यासक आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू त्र्यंबक कृष्णाजी टोपे यांचे निधन. गोपाळ कृष्ण गोखले आणि न्या. महादेव रानडे यांच्या जीवनकार्याबद्दल चिकित्सक पुस्तके त्यांनी लिहिली. तसेच 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील सामाजिक व शैक्षणिक पुस्तकांचे लेखन केले. **२०१५:-** लेखक

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० फेब्रुवारी

१) श्री. केशव बंडू पांचाळ
२०-२-१९४५ अलिबाग
२) श्री.प्रकाश सदाशिवराज जोशी
२०-२-१९४४
बालाजीमंदिर, अलिबाग
३)श्रीम.विभा वसंत म्हात्रे
२०-२-१९५२
मु.बामणोली, ता.अलिबाग

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

शेतीला दिला उत्पन्नाचा आयाम

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील खांडस ग्रामपंचायत पेटारवाडीमधील आदिवासी शेतकऱ्याने तब्बल ५०० मीटर अंतरावरून पाणी आणून भाजीपाला शेती केली आहे. काकडी आणि काही भाज्यांची लागवड करुन त्यांनी उत्पन्नाचा नवीन स्त्रोत निर्माण केला आहे.

■ **एक एकर जमिनीवर काकडीची लागवड**

पेटारवाडी येथील वसंत कान्हू वारघडे हे शेतकरी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहसाठी भाजीपाल्याची शेती करतात. पोश्री नदी हि साधारण ५०० मीटर अंतरावर आहे. मात्र, नदीपासून शेतीचा भाग यामध्ये तीव्र चढ असल्याने पाणी शेतात आणण्यासाठी अधिक इंधन खर्च करावे लागते. डिझेल पंपासाठी दिवसाआड ८०० रुपये खर्च येतो. काही विघ्नसंतोषी लोकांकडून पाईपलाईन तोडण्यात आली. तरी देखील वसंत आणि आशा वारघडे हे जिद्दीने भाजीपाला शेती करत आहेत. एक एकर जमिनीवर वारघडे यांनी काकडीची शेती केली. त्याचवेळी चवळी, झेंडूची फुले यांची देखील शेती केली असून काकडीचे नाझिया जातीचे बियाणे वापरले आहे. या बियाणांपासून अवघ्या ४१ दिवसात काकडीचे पीक शेतीतून मिळत आहे.

सेजल घुमकर यांचा सत्कार

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

तालुक्यातील नांदगावच्या श्रीमंत ज्ञात गंगा भंडारी समाजाच्या महिला मंडळातर्फे व रथसप्तमी हळदीकुंकू समारंभानिमित्त नांदगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सेजल सुदेश घुमकर यांचा समाजातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी समाजसेविका परेरा यांनी उपस्थित महिलांना स्वच्छतेबाबत माहिती दिली. तसेच, घर व परिसरातील ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येकी दोन पिशव्यांचे वाटप केले. भंडारी समाजातील सर्व महिलांना हळदीकुंकवाचे वाण देण्यात आले.

यावेळी स्मिता खेडेकर, अर्चना खोत, मनाली मयेकर, श्रध्दा भाटकर, सुचित्रा खेडेकर, पुष्पलता साखरकर, श्रध्दा पेडणेकर, पुर्वा पेडणेकर, शितल खेडेकर, सुर्वे, पुलेकर, कांबळे, साखरकर, खेडेकर, धामणस्कर आदी महिला उपस्थित होत्या.

एकदरा गायमुखवरील डोंगराला वणवा

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड एकदरा गायमुखवरील डोंगरावर संध्याकाळच्या वेळी वणवा लागुन मोठया प्रमाणावर आग पसरली होती.

या ठिकाणी सुका पालापाचोळा, वृक्ष आणि वाळलेल्या फांद्या असतात. या भागात जर वणवा किंवा आग लागली तर संपूर्ण परिसरात वणवा भयावह रुप धारण करतो. या वनव्यामुळे वृक्षसंपत्ती आणि तृणभक्षी वन्यजीव नष्ट होण्याच्या मार्गावर दिसत आहेत. त्यामुळे पर्यावरणातील संतुलन बिघडण्यासाठी हे वणवे कारणीभूत ठरत आहेत. तालुक्याला पर्वत, नद्या, जंगले, वन्यपशू, पक्षी, तलाव, झरे, दऱ्या इत्यादी नैसर्गिक वरदान स्वरुपात आहे. परंतु, ही संपत्ती योग्यप्रकारे संरक्षण केली जात नाही.

ऐन थंडीत वणवा लागला कि लावण्यात आला, असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे.

'उदया' प्रकल्प अंतर्गत कार्यशाळा

। अलिबाग । वार्ताहर ।

भारतीय उद्योजकता विकास संस्था, ई.डी.आय.आय व टाटा कम्युनिकेशन्स लि. मुंबई द्वारा आयोजित उदया प्रकल्प अंतर्गत प्रशिक्षित माहिला उद्योजिकांकरीता एक दिवसीय बी.टु.बी. कार्यशाळेचे आयोजन शुक्रवारी (दि.२३) सकाळी १० ते १ या कालावधीमध्ये आदर्श पतसंस्था सभागृह अलिबाग येथे करण्यात आले आहे. या प्रकल्पाअंतर्गत भारतीय उद्योजकता विकास संस्थेद्वारा प्रशिक्षित माहिला उद्योजिकांना आपल्या वस्तुला बाजारपेठ मिळावी, त्यांच्या वस्तुची जाहिरात व्हावी. या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

वक्तृत्व स्पर्धेत विद्या मंदिराचे यश

। नेरळ । वार्ताहर ।

येथील विद्या मंदिर मंडळाकडून दरवर्षी शांताबाई नाडकर्णी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेत कर्जत, खालापूर आणि अंबरनाथ तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत सांघिक विजेतेपद नेरळ विद्या विकास शाळेने पटकावले.

स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी विद्या मंदिर मंडळाचे संयुक्त सचिव विवेक पोतदार, डॉ. मिलिंद पोतदार, आसावरी काळे, प्रमोद विचवे, मछिंद्र परदेशी, डी.एस. गजभिये, राजू झुगरे, राखी पोद्दार, सुमित्रा गायकवाड आदी प्रमुख उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेत माध्यमिक वरिष्ठ गट आठवी ते बारावी नेरळ विद्या विकास शाळेची दक्षता संतोष डुकरे प्रथम तर चैतन्या सुभाष पेरणे दुसरी, तसेच तिसरा क्रमांक नेरळ विद्या मंदिर शाळेची गीत गजानन भंडारे आणि चतुर्थ क्रमांक अनंता शिसवे यांना देण्यात आले. पाचवी ते सातवी कनिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक नेरळ विद्या मंदिर शाळेची धन्वनतरी महांगर, दुसरा क्रमांक अभिनव प्रशाला कर्जत येथील साहिल सिनारे तसेच तिसरा क्रमांक विद्या विकास मंदिर नेरळ येथील रिया शंकर पाटील आणि चतुर्थ क्रमांक तेजल तुकाराम सावंत यांना देण्यात आला.

रायगड प्रेस क्लबचा वर्धापन दिन

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

रायगड प्रेस क्लबचा १९ वा वर्धापन दिन आणि प्रेस क्लब सन्मान सोहळा रविवारी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर उत्साहात संपन्न झाला.

रायगड प्रेस क्लबच्या या सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथींच्या हस्ते मान्यवर पत्रकारांना पुरस्कार वितरित करुन सन्मानित करण्यात आले. तसेच, अतुल कुलकर्णी (आ.अत्रे राज्यस्तरीय संपादक सन्मान), संजय खांबेटे (प्रेस क्लब जीवन गौरव सन्मान), अभय आपटे, स्नेहल पाटकर, महेंद्र दुसार, मोहन जाधव, दीपक पाटील, काशिनाथ जाधव, इलियास ढोकले, पुनम धुमाळ, संतोष ठाकूर, विजय गिरी, संतोष रेळेकर, रविंद्र कान्हेकर आदि पत्रकारांना गौरविण्यात आले. तर, विशेष स्थानिक सन्मान अली अब्दुल रझाक काझी, इफ्तीखार शब्बीर चरफरे, महंमद हनिफ गफार मेमन, विक्रम गायकवाड, दीपक धनवटे, किशोर वाडिया व रुपेश तिताडे यांना जाहीर करुन गौरविण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाला पत्रकारांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

माजी विद्यार्थिनी नीलम पवारचा सत्कार

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील वऱ्हाड जांभूळपाडा येथील ज.नौ. पालीवाला महाविद्यालयातील माजी विद्यार्थीनी निलम श्याम पवार हिने वाशी मुंबई येथील 'मेसमेरिक मिस इंडिया पेगिएन्ट २०२४' या स्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल शेठ ज.नौ. पालीवाला महाविद्यालयात प्राचार्य सुधाकर लहुपचांग यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्राचार्य लहुपचांग यांनी सांगितले की, शेठ ज.नौ. पालीवाला महाविद्यालयात शिक्षण घेऊन पुढे गेलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी गरुड भरारी घेत विविध क्षेत्रात अव्वल स्थान मिळवत राज्य आणि देशपातळीवर अभिमानस्पद कार्य केले आहे. नीलम पवार हिने सौंदर्य स्पर्धेत मिळवलेले यश वाखाणण्याजोगी असून तिने भविष्याच्या काळात या क्षेत्रात अलौकिक यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उंचवावे.

यावेळी डॉ. सुधाकर लहुपचांग, मधुकर बडगुजर, स्नेहल बेलवलकर, अंकुश सोहनी, ज्ञानेश्वर मुंढे, यशवंत भांडकोळी, उमेश इनामदार, भारती आरोटे, सरिता देशमुख, जया मचीगर, अपर्णा केदारी, कृष्णा जांभेकर, डॉ. अनील झेंडे, सतू चव्हाण, भक्ती साजेकर आदी उपस्थित होते.

कर्ज योजनांसाठी सहकारी बँकांचा समावेश करा

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

■ **प्रवीण काकडे व अमोल गावडे यांची मागणी**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्यावतीने विविध कर्ज योजना, व्याज परतावा योजना, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी सुरू आहेत. या योजनांचा फायदा मिळण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकाची आवश्यकता आहे. मात्र, अनेक अडचणींमुळे राष्ट्रीयकृत बँकेत अशी कर्ज प्रकरणे मंजूर होत नाहीत. त्यामुळे या योजनांचा लाभ मिळण्यासाठी यामध्ये नागरी सहकारी बँकांचा समावेश करावा, अशी मागणी मंत्री अतुल सावे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे प्रवीण काकडे व अमोल गावडे यांनी केली आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास प्रतिवर्षी भरपूर प्रमाणात निधी उपलब्ध होत असतो. परंतु, सर्वसामान्य, भटक्या जमातींना त्याचा लाभ मिळत नसल्याने तो निधी प्रतिवर्षी परत जातो. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळामधील असलेला धनगर समाज व इतर भटक्या जमाती गेली ७५ वर्षे पूर्ण होऊनही या समाजाला त्याचा लाभ झाला नाही. तरी तो होणे खूप गरजेचे आहे. विविध जाती जमातीसाठी महामंडळ निर्माण केली. मात्र, खऱ्या अर्थाने जेवढी आश्वासने दिली आहेत तेवढी प्रकरणे मंजूर करण्यात येत नाहीत व अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे बेरोजगार युवकांचे प्रमाण वाढत असल्यामुळे नोकरीचासुद्धा प्रश्न खूप मोठ्या प्रमाणात गंभीर आहे. त्यामुळे राज्याने ज्या काही विविध जाती जमातीची युवा उद्योजकांच्या बाबतीमध्ये ज्या काही योजना आणलेल्या आहेत, त्याबाबत राष्ट्रीय बँकांमध्ये अडवणूक केली जाते.

त्यामुळे नागरिक सहकारी बँकांचा समावेश करून नवउद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन त्यांच्या हाताला काम मिळेल आणि बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.

भूषण तळणीकर यांच्या किर्तनरूपी सेवेचे आयोजन

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील धाटाव गावाचे स्व. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत शिवराम मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त बुधवारी सकाळी १० वाजता धाटाव येथील निवासस्थानी किर्तनकार भूषण महाराज तळणीकर (लातूर) यांच्या किर्तनरूपी सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रगल्भ विचारसरणी, लहानपणापासून ते आजतागायत वारकरी परंपरेचे किर्तन कसं असावं याचे ऊदाहरण म्हणजे भुषण तळणीकर. किर्तन मर्यादा याच्या पलीकडे न जाता वारकरी परंपरा जपण्याचा प्रयत्न सध्याच्या फॅशनेबल दुनियेत त्यांनी जपला आहे. साधे राहणीमान आणि उच्च विचार सरणी हि त्यांची खास ओळख आहे. स्व. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत शिवराम मोरे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त संपन्न होणाऱ्या या पुण्यस्मरण दिनानिमित्त किर्तनरूपी सेवेसह विविध प्रकारच्या धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मोरे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

नरेंद्राचार्य महाराज संस्थानचे रक्तदान शिबीर

। उरण । वार्ताहर ।

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थांनच्या माध्यमातून उरण तालुक्यातील इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकूण २१० रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्ताची गरज लक्षात घेता संपूर्ण महाराष्ट्रात या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

■ **एकूण २१० रक्तदात्यांनी केले रक्तदान**

महारक्तदान कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबासो कालेल, अधिकारी कर्मचारी वर्ग, प्राची नायर, डॉ. रुची पुनामिया, डॉ. गौरव, डॉ. सिमरन, सोपान ठोंबरे, ज्ञानेश्वर पाटील, दीपाली पाटील, रमाकांत बंडा, त्रिवेणी ठाकूर, नंदा बंडा, मिनल जोशी, देवेश गाताडी, जनार्दन भोईर, पांडुरंग भोईर, संगीता पाटील, सुजीत पाटील, प्रिया पाटील व सर्व संग्राम सैनिक, युवा सेना यांनी विशेष मेहनत घेतली.

महाराष्ट्रात सिकलसेल अनेमिया, हिमोफिलीया, थलॅसेमिआ, ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर पेशंट जास्त आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्यांना रक्तबाटल्या देण्याचे संप्रदायामार्फत निश्चित केले आहे. त्या अनुषंगाने सर्वत्र रक्तदान शिबीरे आयोजित करण्यात आली आहेत. महारक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

कर्तृत्वसंपन्न व्यक्ती, संस्थांचा सन्मान

। अलिबाग । वार्ताहर ।

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे संसदरत्न खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकाभिमुख कर्तव्यसंपन्न आदर्श व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी धनंजय वर्णेकर, जालंधर काळोखे, डॉ. अविनाश वाचासुंदर, राकेश सोनिगरा, वैशाली देशमाने, डॉ. अजित जगताप, आरती भेगडे, नीता मोहिते, खंडू भोंडवे, सुर्यकांत ताम्हाणे, खुशी मुल्ला, रामदास माळी, बसवराज कनजे, शिवदुर्ग मित्र लोणावळा ट्रेकिंग ॲण्ड ॲडव्हेचर क्लब, एसकेएफ कामगार युनियन, सातारा मित्रमंडळ, गणेशम-२ सोसायटी, रामतीर्थ हौसिंग सोसायटी, रिचमंड सोसायटी यांचा सन्मान करण्यात आला.

रामकृष्ण मोरे यांनी शहरातील अनेकांना घडवले. पण त्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्याचे काम फक्त आप्पांनीच केले, अशा भावना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केल्या.

डॉ. सदानंद मोरे, अशोक समर्थ यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला. कार्यक्रमासाठी खा. श्रीरंग बारणे, विश्वजीत बारणे, नामदेव जाधव, कविचंद भाट, नारायण बहिरवडे, निलेश तरस, मधुकर कंद, ज्ञानेश्वर दळवी, रवी नामदे, उदय आवटे, धनाजी बारणे, माऊली घोगरे, बाळासाहेब वाघमोडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जमिनीचे आरोग्य शेतीसाठी महत्त्वाचे

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

नैसर्गिक शेतीने जमिनीचे आरोग्य सुधारते; परंतु रासायनिक अवशेषमुक्त अन्न निर्मितीसाठी प्रयत्न करा. नैसर्गिक शेती केल्यास भरघोस उत्पादन येते. यासाठी जमिनीचे आरोग्य महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान, कृषी विज्ञान केंद्र व छत्रपती शिवाजी कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान जिजामाता संकुल, ओरोस येथे आनंदोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक शेती, आंबा, काजू मोहर संरक्षण, वन्य प्राण्यांपासून शेतीचे संरक्षण व बांबू लगवड या विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या.

नैसर्गिकरित्या विविध पिकांची लागवड

डॉ. सावंत म्हणाले, सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे. जमिनीचे उत्तम आरोग्य व संतुलन राखण्यासाठी नैसर्गिक शेती महत्त्वाची आहे. नैसर्गिक शेतीला प्राधान्य देण्यात यावे. जेणेकरून रासायनिक अवशेषमुक्त अन्न व आरोग्य सुरक्षा देता येईल. नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्चात बचत होते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक बचत होऊन निव्वळ नफा वाढतो. किर्लोस कृषी विज्ञान केंद्र व छत्रपती शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या अनुभवातून शिकण्याची गरज असल्याचे मत डॉ. सावंत यांनी व्यक्त केले.

धान्य व शैक्षणिक साहित्य वाटप

। तळा । वार्ताहर ।

तालुक्यातील चरई आदिवासीवाडी शाळेत रविवारी (दि.१८) छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने धान्य व शैक्षणीक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. जतीन कोठारी, डॉ. सचिन अलमेला, रमेश गाला, धीरज गाला, भगवान पटेल, किशोर शाह, हंसा अरविंद पटेल, विनित शाह, कल्पेश आर. शाह, समीर नवघरे, डॉ. फुलरेनू, शोभा अशोक बंका, भाविका अश्विन ओरा, रिमा रवी या सर्व दात्यांनी शंभर कुटुंबांना अत्यावश्यक धान्य किट वाटप केले. तसेच, शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर व शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील केले. ग्रामीण भागातील आदिवासी पाड्यांवरील शाळांमधून शैक्षणीक साहित्य वाटून शैक्षणीक स्तर उंचावण्यासाठी व शिक्षणाची गोडी लागावी या हेतूने दानशुर व्यक्ती मदतीचा हात पुढे करीत आहेत. या कार्यक्रमाला डॉ. राधिका, नवरे, रीमा, पटेल, अतुल व त्यांच्या सोबत आलेल्या संपूर्ण टीमचे पालक, ग्रामस्थ, शाळेतील शिक्षकांकडुन सर्व दात्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. या नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

रायगडात महाराजांचा जयजयकार

अलिबागमध्ये ठिकठिकाणी शिवजयंती साजरी

हातात भगवा जरीपटका, मुखात जय भवानी, जय शिवाजीचा जयघोष, ऐतिहासिक देखाव्यांनी सजलेल्या मिरवणुका, हजारोंच्या संख्येने सहभागी झालेले शिवप्रेमी अशा उत्साही वातावरणात सोमवारी (दि.१९) छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा रायगडात सर्वत्र उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या उत्सवामुळे अवघा रायगड शिवमय झाल्याचे दिसून आले होते. शासकीय, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सरकारी स्तरावर शिवजयंतीचा सोहळा साजरा करुन युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करण्यात आला.

। अलिबाग । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अलिबागमध्ये ठिकठिकाणी सोमवारी (दि. १९) साजरी करण्यात आली. यानिमित्त दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक उपक्रमांसह समाज प्रबोधनाचे कार्यक्रम यावेळी शहरी भागासह ग्रामीण भागात घेण्यात आले.

अलिबाग शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, उमाकांत कडनोर, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक अंगाई साळुंखे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी 'जय जय महाराष्ट्र माझा' 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताचे अत्यंत उत्साहात गायन करण्यात आले. त्यांतर जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागामधील तहसीलदार उमाकांत कडनोर यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसिलदार मनोज गोतारने तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

अलिबाग शहरामध्ये ठिकठिकाणी दुचाकी रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना देण्यात आली. तरुणांसह अनेकांनी पारंपारीक पेहराव करीत, हातात भगवा झेंडा फडकवीत महाराजांचा जयघोष केला. त्यामुळे अलिबाग शहरासह ग्रामीण भाग महाराजांच्या जयघोषाने दुमदूमून गेला. गावांतील तरुणांनी एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पोवाडयाचे सादरीकरण करीत महाराजांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम केले. एक वेगळा उत्साह व उमेद घेऊन अलिबागमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

ना.ना.पाटील शैक्षणिक संकुल पोयनाड येथे शिवजयंती साजरी

। पेझारी । वार्ताहर ।

'रयतेचा कल्याणकारी राजा, महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवछत्रपती शिवाजी महाराजांची ३९४ वी जयंती को. ए. सो. ना. ना. पाटील शैक्षणिक संकुल पोयनाड येथे संपन्न झाला.

प्रारंभी मुख्याध्यापक शशिकांत पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी इंग्रजी माध्यम प्रमुख ललिता पाटील, संतोषवरी मठुपती, शाळा समिती शिक्षक प्रतिनिधी देवेंद्र पाटील, शकुंतला म्हात्रे, तृप्ती पिळवणकर, उदय पाटील तसेच शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक वर्ग व विद्यार्थी असा मोठा समुदाय उपस्थित होता.

कार्यक्रम प्रसंगी संगीत शिक्षक राजेंद्र म्हात्रे, सुनील पाटील व कलापथकांनी 'निश्चयाचा महामेरू' हा श्लोक व पोवाडा सादर केला.

यावेळी इयत्ता पाचवी ते सातवीतील नृत्याची आवड असणाऱ्या विद्यार्थीनींने सादर केलेल्या 'झुलवा पाळणा बाल शिवाजीचा' या समूह नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. तसेच बाल शिवप्रेमी आराध्या म्हात्रे, अक्षरा जगताप, हार्दिका पाटील, तन्वी पवार, मानवी विश्वजीत पाटील, विहान कुलदीप पाटील, हार्दिक योगेश भोसले, मैथिली योगेश पाटील, रागिनी सागर धोबी, स्मित जुईकर, आराध्य पाटील, श्रेया सोनकर यांनी शिवचरित्रावर आधारित भाषणे केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली शिरीषकुमार पाटील यांनी केले.

सारळ शाळेत विद्यार्थ्यांची वेशभूषा

। अलिबाग । वार्ताहर ।

जनता शिक्षण मंडळ प्राथमिक शाळा-सारळ येथे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.

प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळेतील मुलांनी शिवराय, त्यांचे कुटुंबिय व स्वराज्य निर्मितीच्या कार्यात योगदान केलेल्यांच्या वेशभूषा केल्या होत्या.

शिवरायांची आरती म्हणत लेझीमच्या ठेक्यावर दगडी शाळा सारळ ते सारळ गावातील चव्हाट्यापर्यंत मिरवणूक काढली.

तसेच तेथे (एकच राजा) या गीतावर लेझीम नृत्य सादर केले. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संतोष मढवी, प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक वृंद, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

वडेर हायस्कुलमध्ये प्रश्नमंजुषा कार्यक्रम

। पाली /बेणसे । वार्ताहर ।

पालीतील ग. बा. वडेर हायस्कूलच्या सहकार्याने व वाकणगावमधील तरुणांच्या वतीने तसेच शिवप्रेमी आणि पालीतील मुस्लिम समाजांच्या मदतीने शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर शिवरायांच्या चरित्रावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रम राबविण्यात आला. शिवरायांचा इतिहास फक्त गुण मिळवण्या पुरता मर्यादित न राहता तो आपल्या जीवनाचा भाग बनावा आणि भविष्यात सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन स्वराज्य, सुराज्य निर्माण करून गुण्या गोविंदाने राहावे आणि राज्य देश आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मजबूत होण्यासाठी शिवरायांची प्रेरणा, ध्येय आजच्या तरुणांना मार्गदशक होईल. त्या अनुषंगाने घरा घरात शिवजयंती होऊन चर्चा घडावी म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला.

या स्पर्धेत रुद्र सावंत, आर्या गायकवाड, आर्या फाटे, जान्हवी काळे, सेजल हुले व ओंकार खंडागळे स्पर्धेत विजयी ठरले. त्यांना शिवप्रतिमा भेट देण्यात आली. कार्यक्रमास पोंगडे महाराज, भगवान दळवी, राजेंद्र राऊत, पायनी आणि ग. बा. वडेर हायस्कूलचे शिक्षक उपस्थित होते.

राज्य गीताने शिवरायांना मानवंदना

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने महाराष्ट्राचे राज्य गीत सादर करुन राजे शिवछत्रपती महाराजांना मानवंदना देण्यात आली. यावेळी नगरपरिषद कार्यालयातील प्रांगणात शिवजयंतीनिमित्त सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. तसेच दत्तवाडी येथील शिवाजी चौकातील शिवछत्रपती महाराजांच्या पुतळ्यास प्रमोद भायदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन 'जय भवानी जय शिवाजी' 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' 'हर हर महादेव', 'जय जिजाऊ', अशा घोषणांनी मुरुड परिसर दुमदुमला होता. यावेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी-पंकज भुसे, प्रमोद भायदे, सतेज निमकर, नायब तहसीलदार संजय तवर, मंडळ अधिकारी खुषाल राठोड, संजय वेटकोळी, राकेश पाटील, अभिजित चांदोरकर, अशोक सबनीस, भुसाणे, सायली गुंजाळ, सुदेश माळी, सतिष जंजिरकर, विजय सुर्वे, दिपक शिंदे, प्रशांत कासेकर आदिंसह शिवप्रेमी उपस्थित होते.

कर्जतमध्ये महाराजांना अभिवादन

। कर्जत । वार्ताहर ।

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त नेरळ शहरातील शिवाजी महाराज चौकात महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड. रंजना धुळे, सीमा गरुड, राजश्री कोकाटे, मनिषा पाटिल, अंकिता मोरे, रेणुका चंचे, मीनल धुळे, लक्ष्मी शिंगटे, शैला सावकर, वंदना विसावे, गायत्री भालेराव, निलम बडवळकर, साक्षी ठाकरे, पदमा हजारे, लता येवले, संचीता शेळके, प्रतीक्षा साळसकर, अनु गोरे, रेश्मा सकपाळ, सुनीता गोटेकर, मिक्का मीना, चित्रा येवले, सविता येवले, अपेक्षा सालसकर आदी उपस्थित होत्या.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- विहिरी - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- सागर तरंग बीच रिसॉर्ट नागावमध्ये कामासाठी जोडपे पाहिजे आहे व मुलगा पाहिजे आहे. तरी संपर्क साधावा मोबाईल नंबर- ९३७१७१४५५२/९३७१७१४५५६
- शिवणकामाकरीता शिकावू तसेच अनुभवी महिला मुली पाहिजेत स्वामी समर्थ मठाजवळ, पिंपळभाट . मो नं.९०११२९३१२१, ७२१९३०८००६
- पाहिजेत : महान डेपो-रामराज ता. अलिबाग येथे शेतावर राहून काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. संपर्क : ९८२२००१८५३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

शालेय विद्यार्थ्यांची शोभायात्रा

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांनी शोभायात्रा काढून महाराजांच्या घोषणांनी सारा आसमंत दणाणून सोडला होता. मावळ्यांच्या वेशभूषेतील शालेय विद्यार्थी शोभायात्रेत आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले होते. गव्हाणकर ट्रस्ट या शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराजांच्या पराक्रमाची यशोगाथा पोवाड्यातून सादर केली होती. श्रीराम चौकात महाराजांच्या जीवनावर भाषणे सादर केली. यावेळी नगरपरिषद प्रशासक तथा कार्यक्षम मुख्याधिकारी राहुल इंगळे, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, योगेश जाधव यांसह शालेय शिक्षक, शिक्षिका, दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक तसेच नगरपरिषद कर्मचारी, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

चिरनेरमध्ये शिवरायांचा जयघोष

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील चिरनेर येथे श्री महागणपती तीन आसनी ऑटो रिक्षा चालक-मालक संस्थेच्या वतीने संस्थेचा पाचवा वर्धापन दिन व शिवजयंतीचे आयोजन पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या मैदानावर करण्यात आले होते. यावेळी महाराजांना अभिवादन करून, भगवा फडकविण्यात आला. तसेच शिवरायाचा जयघोष करण्यात आला. कार्यक्रमास संतोष ठाकूर, भास्कर मोकल, सचिन घबाडी, सुरेश पाटील, सुशांत पाटील, राजेंद्र भगत, अरुण पाटील, समीर डुंगीकर, सुरज म्हात्रे, जयेश खारपाटील, चेतन चौलकर, गजानन केणी तसेच अन्य कार्यकर्ते व संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदगावमध्ये बाईक रॅलीचे आयोजन

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीधर रावसाहेब ओव्हाळ यांनी पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच नांदगावमधील रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा नं १ मध्येही शिवजयंती साजरी करण्यात आली. शाळेसमोरील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. शाळेतील विद्यार्थीनींनी शिवरायांच्या शौर्याच्या कथा सादर केल्या. यावेळी नांदगावमधील तरुणांनी बाईक रॅलीही काढली होती.

पेणमध्ये शिवजयंती उत्साहात

। पेण । प्रतिनिधी ।

पेण नगरपालिकेडून शासकीय शिवजयंती छत्रपती शिवाजी महाराज चौकात सोमवारी(१९) दिवसभर 'जय शिवराय जय जिजाऊ' नाद घोषणांनी आसमांत दुमदुमला होता. नगरपालिकेच्या कार्यालयापासून कर्मचारी अधिकारी वर्गाने तसेच लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे पालखीचे आयोजन केले होते. या पालखी सोहळयामध्ये प्रीतम पाटील, वैशाली कडू, शेहनाज मुजावर, तेजस्विनी नेने, अनिरुध्द पाटील, संतोष पाटील, अजय शिरसागर, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ, मुख्याधिकारी जीवन पाटील अदी मान्यवरांचा समावेश होता.

पेण नगरपालिकेच्या सभागृहामध्ये मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळयास पुष्पहार घालून विधिवत पुजा केली. त्यानंतर प्राचार्य एम. एन. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन शैली व कर्तुत्वाबद्दल माहिती दिली. शेवटी न.प.महिला कर्मचारी वर्गांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पाळणा गीत नृत्य सादर केले. असे वेगवेगळया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभरात अनेक शिवप्रेमी तरुणांनी महाराजांच्या वेगवेगळया गडांवरून शिवज्योतीसह तरुण वर्ग महाराजांना मानवंदना करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकात येत होते. त्यामुळे पुर्ण शहरात शिवमय वातावरण पहायला मिळाले. ग्रामीण भागामध्ये देखील मोठया प्रमाणात शिवजयंती साजरी करण्यात आली होती.

शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी लाठीकाठीचे खेळ सादर करताना. (छायाचित्र : श्रेया फोटो)

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी संघटना शाखा रायगड यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजाच्या जयंतीनिमित्त कळंबोली येथील घाटी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी जन्मोत्सव देखावा सादर केला. (छायाचित्र : राजेश डांगळे)

खांदा कॉलनीत प्रतिमेचे पूजन

पनवेल : अखंड भारताचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती खांदा कॉलनी येथील नील्स लेक व्ह्यू सोसायटीत शिव प्रतिमेचे पूजन करून साजरी करण्यात आली. यावेळी सिध्दी खेडेकर यांनी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाला चेअरमन व्यंकट चेलापल्ली, कोषाध्यक्ष महेंद्र कांबळे, दिलीप वाघ,विजय आनंद, निखिल काटे, किरण शिंदे आणि कार्यकारिणी सदस्य तसेच सोसायटीमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भिसे खिंडीमधील मातीचे ढिगारे अपघाताला निमंत्रण

सुकेळी : रोहा- नागोठणे मार्गावरील भिसे खिंड चर्चेत असतानाच खिंडीमध्ये रस्त्याच्या साईडपट्ट्यांचे काम करण्यासाठी जी माती टाकण्यात आली आहे. ती माती वळणांवरती रस्त्यावरच टाकण्यात आली आहे. हे मातीचे ढिगारे वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्यामुळे वाहनांना मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची शक्यता आहे.

या मार्गावरील रस्त्याचे काम हे चांगल्या प्रकारे झाल्यापासून रोहा - नागोठणे मार्गावर सध्या मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरू आहे. रोहा, मुरुडकडे जाण्यासाठीदेखील अनेक वाहने ही याच मार्गाने प्रवास करीत असतात. परंतु सद्यपरिस्थितीत रस्त्याच्या बाजूला ज्या साईडपट्ट्या आहेत त्या भरण्यासाठी जी माती टाकण्यात येत आहे. ती काही माती साईडपट्टीवर तर काही माती ही रस्त्यावर टाकण्यात आलेली आहे. मातीचे बहुतेक ढिगारे हे या खिंडीमध्ये असलेल्या वळणांवरती रस्त्यावर टाकण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवतांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. रात्रीच्या वेळेस तर हे ढीग दिसण्यात येत नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यतादेखील नाकारता येत नाही. लवकरात लवकर वळणावरती असलेले मातीचे ढिगारे बाजुला करण्यात यावे अशी मागणी वाहनचालकांमधून होत आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that my client **SOU. KALAISELVI SRINIVASA,** ect. Residing at Plot no 467/A, Vora bhuvan flat no 303,3rd floor Dr Ambedkar Road opp. Maheshwari Udyan Matunga, East Mumbai 400019 has agreed to purchase the Agricultural Land mentioned in the schedule from the **Owners of the land, MRS. RUKSANA ANVAR PATEL & MR. ANVAR HUSENMIYA PATEL Residing at Panvel.**

DESCRIPTION OF PROPERTY
VILLAGE- AMBIVALI, TAL. PEN, DIST, RAIGAD

Gut NO.	Area (H.R.)	Assessment (Rs.Ps.)
12	0.17.50 Pot Kharaba 0.00.50 **Total 0.18.00**	1.44

This agriculture land is subject of this notice.

All person claiming an interest in the said property or any part there of by way of sale, gift, lease, inheritance, exchange,mortgage, charge, line, trust, possession, easement. Attachment or otherwise howsoeverare hereby required to make the same known to the undersigned at his office within 14 days from the date hereof failing which the said sale will be compieted, without any reference to such claim and the same, if any, shall be considered as waived.

Pen
Date - 18/02/2024

Adv.R.R.Mhatre.
Parmar Plaza, Gala No. 9
Near Pen Pollice station,
Tal-Pen, Dist.-Raigad
Mob - 7350811055/ 9422689598

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सर्वे, ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजय छगनलाल जैन यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गटनं./हि. नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रु. पै.)
सर्वे	१५४/२/३	०-६८-५०	११.०६
	पो. ख.	०-०३-३०	
		०-७१-८०	

पैकी ० हे. ३०.०० आर, आकार ४ रूपये ८४ पैसेही मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतरहक्क या अथवाअन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांसकळावे.

अलिबाग
तारीख : २०/२/२०२४

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

Date : 20.02.2024

BEFORE THE PRESIDENT MAHARASHTRA
RECENUE TRIBUNAL MUMBAI
REVIEW APPLICATION NO. 02 OF 2023
No. TNC/REV/RAG/8/2017

1. Shri Vitthal Narayan Kadam & Others ... Applicants
Vs.
1. Shri Deepak Raghunath Pandekar & Others
...Respondents

आमचे अशील श्री. विठ्ठल नारायण कदम, श्री. शिवराम जयसिंगराव कदम, श्री. रामचंद्र बाबुराव कदम, सर्व राहणार वावंढळ, ता. खालापूर, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीनुसार व त्यांनी केलेल्या सुचनेनुसार व निर्देशाप्रमाणे खालील उल्लेख केलेल्या जमिनी संदर्भात जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

आमचे वर उल्लेख केलेले अशील यांनी खालील वर्णन केलेली मौजे वावंढळ, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन.

सर्व्हे क्र.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
१	१+२+३	०-३१-४	२८.१३
१३	२	२-१०-७	१४.५०

ओमकारमल ओसवाल रा. चौक, खालापूर, जि. रायगड यांचेकडून १९५९ साली विकत घेतलेली आहे. त्या जमिनी संदर्भात मा. महाराष्ट्र महसूल प्राधिकरण मुंबई यांचे न्यायालयात त्या जमिनीच्या हक्का संदर्भात खटला चालू आहे. सदर खटला चालू असताना आमचे अशिल यांचेविरूद्ध पक्ष श्री. दिपक रघुनाथ पंदेकर व श्री. बाळाराम यशवंत पंदेकर व त्यांचे कुटुंबिय विकण्याच्या प्रयत्नात आहेत. व तिऱ्हाईत व्यक्तीचा त्या जमिनीत हक्क निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. म्हणून ती जमीन कोणीही घेऊ नये किंवा त्या जमिनीत कुठल्याही प्रकारे विकास करू नये यासाठी ही नोटीस आमचे अशिलांचे तर्फे दिली जात आहे.

सदर जमिनीचा वाद न्यायालयात प्रलंबित असल्याकारणाने कुणाचीही फसवणूक होऊ नये याकरीता ही नोटीस दिली जात आहे. तरी सर्वांना कळविण्यात येते की वरील उल्लेख केलेल्या कुठल्याही व्यक्तींनी या जमिनी संदर्भात काही हालचाल केल्यास किंवा कुठल्याही प्रकारचा दस्त केल्यास, या दस्तापोटी होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी त्या त्या व्यक्तीवर राहील. म्हणून कुणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची नोटीस दिली जात आहे. तरी सदरच्या जमिनीत कोणीही कुठल्याही पद्धतीने हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास त्याबाबत त्या त्या व्यक्तीची जबाबदारी राहील. म्हणून ही नोटीस सावधानतेचा इशारा म्हणून दिली जात आहे याची नोंद घ्यावी. व कुणीही ती जमीन कसावयास किंवा विकास करण्यासाठी घेऊ नये तसे काही झाल्यास सदरची जमीन ज्या व्यक्तीने घेतलेली आहे त्या व्यक्तीवर आमच्या अशिलांच्याकडून नुकसान भरपाईचा दावा दाखल केला जाईल याची नोंद घ्यावी.

शंकर प्र. थोरात
ॲड. हायकोर्ट
९०४, मैत्री हाईटस्, लुईसवाडी
ठाणे पश्चिम, ठाणे ४००६०४
९८६७०००५४४ व ९८६९०१०५७४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे उसरोली, ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक १.श्री.अनिस लालमिया घलटे, २.मुसर्रतजहॉ अहमद लोगडे आणि ३.शाहीन मोअज्जम घलटे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे उसरोली, ता.मुरूड जि.रायगड

गट क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पैसे
४१३	०-८७-२०	१०.४०

पैकी वर नमुद विद्यमान मालकांच्या मालकीची मिळकतीच्या दक्षिण दिशेकडील ०-४०-० हे.आर. आकार ४.७८ इतकी मिळकत

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १९/०२/२०२४

ॲड.दिपक विश्वनाथ नागे
सदनिका क्र.१ तळमजला,
लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसायटी,कामत आळी,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर सूचना

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येते की **श्री मकरंद सुरेश नार्वेकर,** राहणार ८/७, ब्रॅडी फ्लॅट्स, सोराब भरुचा रोड, ओ पास्ता रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ हे आमचे आमचे अशील यांच्याशी शेती भूखंड, गट क्रमांक ९२, ९४/ए /१, ९५, ९६ ,९७ ,११६ ,११८ ,१२१/१, १२१/२, १३६, १३७ या जागेच्या विक्रीकरिता बोलणी करीत आहेत व त्यांनी गट क्र. १३५/२, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील शेतजमीन व जी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत आहे त्या स्पष्ट व विपणनयोग्य हक्कांसहित व सर्व भारांपासून मुक्त अशा मालमत्तेचे हक्क मार्ग (आरओडब्ल्यू) द्वारे अभिहस्तांकन / हस्तांतर करण्याचे मान्य केले आहे.

अशा सर्व त्या व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणतीही व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, बिक्वेस्ट, लीज, सब लीज, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, लिव्ह अँड लायसन्स, कोव्हीनंट, तारण, भार, ट्रस्ट, वारसा, उत्तराधिकार, किंवा कंत्राट किंवा समझोत्याचा करार, इजमेंट, राईट ऑफ वे, व्यवसाय, ताबा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय खरेदी, इजमेंटरी हक्क, स्थायी राईट ऑफ वे आदींच्या माध्यमातून अथवा अन्य कोणत्याही अन्य कोणत्याही माध्यमातून हक्क, हक्क संबंध, स्वारस्य आदी असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे, मेसर्स पूर्णानंद अँड कंपनी, ऍडव्होकेट्स, फोर्ट चेंबर्स, सी, २ रा मजला, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ आणि किंवा ई मेलच्या माध्यमातून harshil.parekhpurnanand.co.in येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून २१ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा कोणत्याही व्यक्तीचे असे दावे अधित्यजित आहेत, असे समजण्यात येईल आणि आमचे अशील अशा कोणत्याही दाव्यांच्या आणि मागण्यांच्या अनुपस्थितीत सदरील व्यवहार पूर्ण करतील. तसेच विहित कालावधीत कोणतेही दावे प्राप्त झाले नाहीत तर, सदरील मालमत्तेवर कोणताही दावा नाही, असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

पहिल्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ९२, मोजमापित ० हेक्टर २८ आर ४० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२६ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९७ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ८९, ९० व ९१ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९३, ९४बी व ९५ धारक जमीन.

दुसऱ्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ९४/ए/१, मोजमापित ० हेक्टर ४१ आर ० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२५ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२१ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १४ हिस्सा क्र. ए/२ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२२, १२३, १२४ व १२५ धारक जमीन.

तिसऱ्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ९५, मोजमापित ० हेक्टर २६ आर ० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९६ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९३ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९२ हिस्सा क्र. ए/२ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९४/ए/१ धारक जमीन.

चवथ्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ९६, मोजमापित ० हेक्टर ३० आर ० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९५ धारक जमीन,पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११८ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११७ हिस्सा क्र. ए/२ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२१ व ९४/ए धारक जमीन.

पाचव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ९७, मोजमापित ० हेक्टर २६ आर ७० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९२ व ८९ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९६ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११७ , ९९ व ९८ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९६ धारक जमीन.

सहाव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ११६, मोजमापित ० हेक्टर २७ आर ३० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११८ व ११९ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९९ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९९ व ११७ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११४ व ११५ धारक जमीन.

सातव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. ११८, मोजमापित ० हेक्टर १४ आर ४० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११९ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९६ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ११६ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२१ धारक जमीन.

आठव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. १२१/१, मोजमापित ० हेक्टर ६५ आर ४० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३६, १३७ १३८ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९६, ११८, ११९ व १२० धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९४/१ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १४० धारक जमीन.

नऊव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. १२१, हिस्सा क्र. २, मोजमापित ० हेक्टर २० आर ०० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३६, १३७ १३८ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९६, ११८, ११९ व १२० धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. ९४ए धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १४० धारक जमीन.

दहाव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. १३६, मोजमापित ० हेक्टर ५ आर ५० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३६ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३८ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३७ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३५, हिस्सा क्र. २ धारक जमीन.

अकराव्या मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. १३७, मोजमापित ० हेक्टर १९ आर ० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३६ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३८ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १२१ धारक जमीन, उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३६, हिस्सा क्र. २ धारक जमीन.

आरओडब्ल्यू मालमत्तेचा तपशील

पुढील विवरणीत फ्री होल्ड रिक्त शेत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. १३५, हिस्सा क्र. २, मोजमापित ० हेक्टर २१ आर २० चौ. मी. क्षेत्रफळ, ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३५ धारक जमीन, पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १४५ धारक जमीन, दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३५, हिस्सा क्र. २ धारक जमीन व १३६, १३८, १३९, १४४ च्या जमिनीचा उर्वरित भाग. उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगाव येथील गट क्र. १३५ धारक जमीन.

२० फेब्रुवारी २०२४

पूर्णानंद अँड कंपनी यांच्या करिता
ऍडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स
६५, टॅमरिंड लेन, फोर्ट चेंबर्स, सी विंग, २ रा मजला,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३, **ई मेल :** harshil.parekhpurnanand.co.in

महसूल व वन विभाग
अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय
कचेरी रोड, माणगांव, जि.रायगड
Email ID: altmangaon@gmail.com
जाहीर नोटीस

प्रति, दावा क्रमांकः१६/२०२४
१.श्री.रामचंद्र गणपत मोरे २.श्रीम.भार्गीथी गणपत मोरे
३.जनार्दन गणपत मोरे ४.श्री.हिरू गणपत मोरे **अर्जदार/कुळ**
५.श्रीम.विठा गणपत मोरे उर्फ सुरेखा पांडुरंग ठमके
६.श्री.अभय देऊ मोरे ७.श्रीम.तनुजा नितीन करंजे उर्फ तनुजा देऊ मोरे
८.श्रीम.रेश्मा देऊ मोरे सर्व रा.टोकार्डे ता.तळा जि.रायगड.
क्र.१ ते ८ यांच्या वतीने अखत्यारी म्हणून
श्री.नितीन रायभान धवणे रा.सदनिका नं.२०४, सि.-४, आंचल नगर,
कुमार पृथ्वी, पुणे सिटी, कोंढवा खुर्द पुणे-४११०१८

विरूद्ध

१.श्री.मधुसूदन सदाशिव भट, २.चिंतामणी माधव भट, ३.श्री.प्रभाकर माधव भट,
४.श्री.भालचंद्र माधव भट, ५.श्रीमती.उषा माधव भट, ६.प्रदिप नारायण भट,
७.अच्युत माधव भट, ८श्री.अजित केशव भट, ९.श्री.अरविंद नारायण भट
१०श्रीमती.अलका राव कोलीपाकम ११.श्री.मालती माधव भट **सामनेवाले/**
१२.श्री विजय नारायण भट, १३.श्रीम.विद्या गणेश आपटे, **जमीनमालक**
१४.श्रीम.सुमती माधव भट, १५.श्री.गजानन पुरूषोत्तम भट
सर्व रा.टोकार्डे,ता.तळा, जि.रायगड.

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायाधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक २२/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव, जि.रायगड येथे स्वतःवकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवुन न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

अनुसूची

गावाचे नांव	स.नं/हि.नं	एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पैसे)
टोकार्डे तळा	५३/१/त	१-२१-००	०-४४

ठिकाण -माणगांव
दिनांक : १६/०२/२०२४

सही/-
(विकास मारूडकर)
अपर तहसिलदार व
शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की मुद्रे खुर्द ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या भुखंड क्रमांक ८/४/अ/२व ८/४/अ/३ चे मालक गायत्री गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित 'मुद्रे खुर्द' ता.कर्जत ची मालमत्ता विकसित करण्याकरीता जाहीर नोटीस.

मिळकतीचे वर्णन : मौजे मुद्रे खुर्द, ता.कर्जत जि.रायगड येथील

अ. क्र.	सि.टी.सर्व्हे व हिस्सा क्र.	प्लॉट क्र.	क्षेत्रफळ	आकार रू.पै.
१	८/४/अ	२	६१५ चौ.मी.	१२.३०
२	८/४/अ	३	५३७ चौ.मी.	१०.७४

या बिनशेती मिळकती विकसित करावयाचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीच्या पुर्नविकासासाठी गायत्री गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित यांस कडून नामांकित बिल्डर आणि डेव्हलपर्स यांच्याकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी सर्व बांधकाम व्यवसायिकांनी त्यांचे प्रस्ताव सात दिवसाच्या आत संस्थेच्या कार्यालयात सादर करावे.

दिनांक : १८/०२/२०२४

अध्यक्ष
गायत्री गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित,
मुद्रे खुर्द ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

(हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मौजे-पाडेघर/वहाळ/सोनखार, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक श्री. बाबू अंबाजी घरत व इतर यांचेकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच

तिसऱ्या दिवशीही तुफान फटकेबाजी

रघुजीराजे आंग्रे यांची प्रमुख उपस्थिती

● छायाचित्र : समीर मालोदे

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कुरुळ येथील आझाद मैदानात पीएनपी चषक क्रिकेट स्पर्धा गेल्या तीन दिवसांपासून सुरु आहे. दुसऱ्या दिवशी डे-नाईट झालेल्या स्पर्धेत वेगवेगळ्या संघांनी आपली कामगिरी बजावत यश संपादन केले. तिसऱ्या दिवशी दुपारी सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी यू.व्ही. स्पोर्ट्स अकादमीच्या संचालिका चित्रलेखा पाटील, भैरवी आंग्रे, विक्रांत वार्डे, रुपेश पाटील, अमोल नाईक आदी मान्यवरांसह खेळाडू, तसेच संघ मालक उपस्थित होते. सुरेश काका इलेव्हन वरसोली आणि अदिरा वॉरिअर्स कावाडे या संघात झालेल्या सामन्यात कावाडे संघाने पाच षटकांत ५१ धावा केल्या. वरसोली संघासमोर विजयासाठी ५२ धावांचे लक्ष्य होते. या संघातील खेळाडूंनी ३.५ षटकांत ५२ धावा करून विजय मिळविला. सुरेश संघाचा शिरू विक याला सामनावीरचा किताब देण्यात आला.

रुद्र वॉरिअर्स आक्षी नागाव व मुस्कान इलेव्हन या संघात झालेल्या सामन्यात मुस्कान इलेव्हनने फलंदाजी स्वीकारत पाच षटकांत ७२ धावा केल्या. आक्षी संघासमोर विजयासाठी ७३ धावांचे लक्ष्य होते. परंतु, आक्षी संघाने ४.२ षटकांत ७६ धावा करून विजय मिळविला. या सामन्यात अक्षय पाटील सामनावीर ठरला.

प्रसाद इलेव्हन अलिबाग आणि रोहांशू इलेव्हन केतकीचामळा या संघांमध्ये झालेल्या सामन्यात केतकीचामळा संघाने फलंदाजी स्वीकारली. त्यांनी पाच षटकांत सात बाद ४८ धावा करून ४९ धावांचे लक्ष्य अलिबाग संघासमोर ठेवले. प्रसाद इलेव्हन संघाने पाच षटकांत ४५ धावा केल्या. त्यामुळे रोहांशु संघाने विजय मिळविला. यामध्ये निशांत पाटील याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

७७०० जिजाऊ चेंढरे आणि सिया वॉरिअर्स नागाव संघात लढत झाली. चेंढरे संघाने पाच षटकांत ७७ धावा केल्या. नागाव संघासमोर विजयासाठी ७८ धावांचे लक्ष्य होते. परंतु, ते लक्ष्य पूर्ण करण्यास नागाव संघ अपयशी ठरला. पाच षटकांत फक्त ५३ धावामध्ये त्यांना समाधान मानावे लागले. या सामन्यात यश जंगली सामनावीर ठरला.

सुरेश काका ११ वरसोली आणि रुद्र वॉरिअर्स आक्षी त्यात झालेल्या सामन्यात वरसोली संघाने क्षेत्ररक्षण स्वीकारले. आक्षी संघाने प्रथम फलंदाजी करीत पाच षटकांत पाच बाद ५२ धावा केल्या. वरसोलीला विजयासाठी ५३ धावांचे लक्ष्य होते. मात्र, या संघाने ४.३ षटकांत ५६ धावा करीत विजय हाती घेतला. यामध्ये किशोर नाईकला सामनावीरचा किताब देण्यात आला.

मुस्कान ११ मांडला आणि आदिरा वॉरिअर्स कावाडे यांच्यात झालेल्या सामन्यात कावाडे संघाने फलंदाजी स्वीकारत तीन बाद ५१ धावा केल्या. मांडला संघाने ३.२ षटकांत ५४ धावा करीत हा सामना जिंकला. हुसेन टाकी याला सामनावीरचा चषक देण्यात आला.

रोहांशू ११ केतकीचामळा विरूध्द ७७०० जिजाऊ ११ चेंढरे संघाच्या लढतीत चेंढरे संघाने सात बाद ५९ धावा केल्या होत्या. विजयासाठी केतकीचामळा संघासमोर ६० धावांची लक्ष्य होते. मात्र, या संघाने ३.५ षटकांत ६१ धावा करीत हा सामना जिंकला. या सामन्यात सामनावीर विघ्नेश कठोर ठरला.

सिया वॉरिअर्स नागाव आणि प्रसाद इलेव्हन अलिबाग या संघांमध्ये सामना झाला. या सामन्यात सुरुवातीला अलिबाग संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. नागाव संघाने पाच षटकांत सात बाद ४० धावा केल्या. अलिबाग संघाने २.३ षटकांत ४२ धावा करीत सहज विजय मिळविला. या स्पर्धेत पवन कोंडाजी हा सामनावीर ठरला.

रुद्र वॉरिअर्स आक्षी आणि मुस्कान ११ मांडला यांच्यात झालेल्या सामन्यात मांडला संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. आक्षी संघाने फलंदाजीला सुरुवात केली. पाच षटकांत सहा बाद ४० धावा केल्या. मांडला संघासमोर जिंकण्यासाठी ४१ धावांचे लक्ष्य होते. ४.३ षटकांत या संघाने ४३ धावा करीत विजय मिळविला. हुसेन डाकी या खेळाडूला सामनावीरचा किताब देण्यात आला.

७७०० जिजाऊ ११ चेंढरे आणि प्रसाद इलेव्हन अलिबाग संघामध्ये झालेल्या सामन्यात प्रसाद इलेव्हन संघाने सुरुवातीला क्षेत्ररक्षण स्वीकारले. जिजाऊ संघाने फलंदाजी करीत सहा बाद ५० धावा केल्या. प्रसाद इलेव्हन संघाने ३.५ षटकांत ५६ धावा करीत विजय प्राप्त केला. या सामन्यात सामनावीर म्हणून प्रतिक घाडी याला गौरविण्यात आले. तिसऱ्या दिवशी सोमवारी (दि.१९) फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता पुन्हा खेळाला सुरुवात झाली. प्रांशी इलेव्हन रोहा आणि ए.बी. ग्रुप अलिबाग या संघामध्ये पहिला सामना झाला. प्रांशी संघाने फलंदाजी करीत पाच षटकांत ५७ धावा केल्या. ए.बी. ग्रुप अलिबाग संघाने ३.५ षटकांत ६० धावा करीत हा सामना जिंकला. या सामन्यात सामनावीराचा किताब प्रज्वल ठाकूर याला मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

आक्षीतील संस्कृतीची सुवर्ण कामगिरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील संस्कृती संदेश घरत हिने राष्ट्रीय आइस स्टॉक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत तीने सुवर्णपदकाची कामगिरी केली. काश्मीरमधील गुलमर्ग येथे ९ ते १४ फेब्रुवारी दरम्यान हिवाळी राष्ट्रीय स्पर्धा घेण्यात आली होती.

२३ राज्यातील ५५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये संस्कृतीने वरिष्ठ गटात वैयक्तिक टार्गेट या प्रकारात सुवर्णपदक मिळवीत प्रथम येण्याचा मान मिळविला. सोबतच टीम गेम या प्रकारात एक सुवर्णपदक व टीम टार्गेट या प्रकारात एक कांस्यपदक प्राप्त केले आहे.

संस्कृतीने पिल्लई कॉलेजमधून कॉम्प्युटर इंजिनिअरचे शिक्षण घेतले असून तिने राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केले आहे.

जयेश चोगले, महेश राठोड,अजय सर्वोदय यांनी तिला विशेष मार्गदर्शन केले आहे. तिला विशेष सहकार्य वैभव राणे (नागाव) यांनी केले.

भारताकडून अमेरिका पराभूत

। रौरकेला । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला हॉकी संघाने रविवारी येथे झालेल्या एफआयएच प्रो लीग या हॉकी स्पर्धेमध्ये अमेरिकन संघावर पेनल्टी शूटआऊटमध्ये २-१ असा विजय मिळवला. त्याआधी निर्धारित वेळेमध्ये दोन्ही देशांमध्ये १-१ अशी बरोबरी झाली होती. भारत-अमेरिका यांच्यामधील लढतीत दीपिका हिने १९व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर गोल करीत भारताला आघाडी मिळवून दिली होती.

४५व्या मिनिटाला सेसा ॲशले हिने अमेरिकन संघासाठी गोल करीत त्यांना १-१ अशी बरोबरी साधून दिली. त्यानंतर दोन्ही देशांना गोल करता आला नाही.त्यामुळे निकालासाठी पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताकडून दोन गोल करण्यात आले. अमेरिकन संघाकडून लीह क्राऊस हिने एकमेव गोल केला.

गेल कर्मचारी, कुटुंबियांसाठी क्रीडा स्पर्धा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील गेल कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी रविवारी (दि. १८) वरसोली समुद्रकिनारी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये क्रिकेट, धावणे, लगोरी, खेळ घेण्यात आले होते. या खेळामध्ये कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी सहभाग घेतला होता.

गेल कंपनीचे मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. यावेळी विरेंदर कुमार, प्रवीण लोखंडे, शितल लकरा आदी अधिकाऱ्यांसह वेगवेगळ्या विभागातील प्रमुख, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. स्पर्धेतील अंतिम विजेत्यांना आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

रणजीत विदर्भाचा हरियाणावर विजय

। नागपूर । वृत्तसंस्था ।

नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघाच्या मैदानावर झालेल्या रणजी सामन्यात विदर्भाच्या संघाने हरयाणाचा ११५ धावांनी पराभव केला. विदर्भ संघासाठी फलंदाजीचा कणा असलेला कर्णधार फैज फजलने रविवारी देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. विदर्भाने हरयाणावर विजय प्राप्त करत फजलला विजयी निरोप दिला. विदर्भाने नाणेफेक जिंकून ४२३ धावा काढल्या. यानंतर हरयाणा संघाला ३३३ धावांमध्ये गुंडाळत ९० धावांची महत्वपूर्ण आघाडी घेतली. हरयाणा संघ २९५ धावांचा लक्ष्याचा पाठलाग करताना १८० धावांमध्ये ऑलआऊट झाला. फैजच्या नेतृत्वात सलग दोन वर्षे रणजी व इराणी करंडक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावण्याची ऐतिहासिक कामगिरी केली होती.

कर्जत नगरपरिषदेची मॅरेथॉन उत्साहात

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत नगरपरिषदेतर्फे शहरामध्ये मॅरेथॉन-२०२४ 'एक धाव आरोग्यासाठी' चे आयोजन केले होते. सहा गटात ही स्पर्धा आयोजित केली होती. या मॅरेथॉनम ध्ये सुमारे एक हजार अबालवृद्धांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नगरपरिषदेने उत्कर्ष इव्हेंट, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक, लाईट ऑफ लाईफ यांच्या सहकार्याने या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. कर्जत नगरपरिषद कार्यालया समोरून ही स्पर्धा सुरू होऊन पुन्हा तेथेच स्पर्धेचा शेवट करण्यात आला.

नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, राहुल डाळिंबकर, बळवंत घुमरे, मधुरा चंदन, विवेक दांडेकर, लाईट ऑफ लाईफच्या कांचन थोरवे यांच्यासह अबालवृद्धांनी डी.जे च्या तालावर वॉर्मअप केला.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून विविध गटांच्या स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

स्पर्धेसाठी राष्ट्रीय खेळाडू जगदीश मरागजे, अमित विचारे, शरद जाधव, समीर येरणकर, स्वप्नील नामदास, समीर शिंदे, दिनेश भुसारी, संदेश देशमुख, दीपक चौरे, आशिष गायकवाड, मयूर जाधव, पियुष पवार, सुजक शिंदे, रितेश गायकवाड, जय गायकवाड, कुणाल जाधव, प्रतीक जाधव, महेंद्र बडेकर, विनोद बडेकर, अमोल जाधव, अनिल सावंत यांनी काम केले. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रदीप गोगटे यांनी करून स्पर्धेत रंगत आणली.

विजेत्यांची नावे लहान गट ८ ते १४ वर्ष मुलेः जय हातनोलकर प्रथम, पोरोमित खरात द्वितीय, ओम मराडे तृतीय. लहान गट-८ ते १४ वर्ष मुली सानिया खाडे प्रथम, आर्या शिंदे द्वितीय, हर्षदा चव्हाण तृतीय. खुला गट पुरुष मंगेश पारधी प्रथम, केतन पारधी द्वितीय, अभिषेक रोजवर तृतीय. खुला गट महिला रोहिणी मोडक प्रथम, कोमल पवार द्वितीय, धनश्री जोशी तृतीय. ज्येष्ठ नागरिक : हरिश्चंद्र ढोले प्रथम, बळीराम भालेकर द्वितीय, मनोहर दरवडा तृतीय क्रमांक पटकवला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)